# गणपती बाप्पा पावला...!
# मराठा-कुणबी एकच!

दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री
www.rashtrasahyadri.com
● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक ३२३
● बुधवार, ०३ सप्टेंबर २०२५ ● पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००





## सर्व मागण्या सरकारकडून मान्य; आरक्षण आंदोलनाला ऐतिहासिक यश

विशेष प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : मराठ्यांना गणपती बाप्पा पावला...! मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली गेल्या पाच दिवसांपासून मुंबईत सुरू असलेल्या आंदोलनाला ऐतिहासिक यश आले आहे. मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राज्याचे जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या. हैदराबाद गॅझेटीयार तातडीने लागू केले. सातारा गॅझेट लागू करण्यासाठी एक महिन्याची मुदत मागितली. तर 'सर्व मराठा ही कुणबी आहेत' या संदर्भातील अध्यादेश काढण्यासाठी शासनाने जरांगे पाटील यांच्याकडे दोन महिन्यांची मुदत मागितली. शासनाच्या भूमिकेला जरांगे पाटील यांनी संमती दर्शवल्यानंतर मराठा आंदोलकांवरील आजपर्यंतचे सर्व गुन्हे मागे घेत असल्याची घोषणा देखील राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. तसेच मुंबईत आंदोलनादरम्यान मराठा आंदोलकांच्या वाहनांवर लावलेले दंडही माफ करण्यात येतील, असे त्यांनी घोषित केले. हुतात्मा आंदोलकांच्या कुटुंबीयांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याचा निर्णयही राज्य शासनाने यावेळी जाहीर केला. मराठा आंदोलनाच्या या ऐतिहासिक यशाची घोषणा जरांगे पाटील यांनी करताच उपस्थित मराठा बांधवांनी एकच जल्लोष केला. आता ओबीसी महासंघ नेमकी काय भूमिका घेतो? याकडे राज्याची लक्ष लागले आहे.** (पान ४ वर)



### मराठा आंदोलकांच्या मागण्या आणि तोडगा

**मागणी १** – हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करावी
**तोडगा** – हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी उपसमिती प्रस्तावित शासन निर्णयास मान्यता देत आहे. या शासन निर्णयानुसार मराठा जातीतील व्यक्तींना, गावातील, कुळातील, नातेवाईकातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास चौकशी करून कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यास कार्यवाही प्रस्तावित आहे.
**मागणी २** – सातारा संस्थान गॅझेट, औंध गॅझेटची अंमलबजावणी करावी, **तोडगा** – सातारा संस्थान, औंध गॅझेटबाबत कायदेशीर बाबी तपासून जलदगतीने निर्णय करण्यात येईल. या विषयात काही किचकट कायदेशीर त्रुटी आहेत. त्यामुळे पुढील १५ दिवसांत अंमलबजावणीबाबत निर्णय घेऊ. यावर जरांगे यांनी १ महिन्याची मुदत दिली.
**मागणी ३** – मराठा आंदोलकांवरील गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत
**तोडगा** – मराठा आंदोलकांवरील विविध ठिकाणचे गुन्हे मागे घेतले आहेत. काही गुन्हे मागे घेण्यासाठी कोर्टात जाऊ. सप्टेंबर अखेरपर्यंत मराठा आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घेतले जातील.
**मागणी ४** – मराठा आंदोलनात बलिदान गेलेल्यांच्या वारसांना आर्थिक मदत आणि सरकारी नोकरी द्यावी
**तोडगा** – मराठा आरक्षण आंदोलनात बलिदान गेलेल्या कुटुंबाच्या वारसांना आतापर्यंत १५ कोटी रुपये मदत शासनाकडून दिली आहे. उर्वरित कुटुंबाला आर्थिक मदत १ आठवड्याच्या आत त्यांच्या खात्यावर जमा होईल. राज्य परिवहन मंडळात नोकरी दिली जाईल. मात्र शैक्षणिक पात्रता पाहून एमआयडीसी, महावितरण आणि राज्य महामंडळात नोकरी द्यावी असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. त्यावर शासनाने होकार दिला.
**मागणी ५** – ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्याचा रेकॉर्ड ग्रामपंचायतीला लावा ही मागणी होती, जात पडताळणी प्रमाणपत्र तात्काळ द्यावीत.
**तोडगा** – उपसमितीला न्यायिक अधिकार दिलेत. याबाबत दर सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन जेवढे अर्ज आलेत, ते निकाली काढू. जात पडताळणी समितीकडे दाखले प्रलंबित राहणार नाहीत. जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील. ग्रामपंचायतीत या नोंदी लावल्या जातील.
**मागणी ६** – शिंदे समितीला कार्यालय द्यावे, वंशावळ समिती गठीत करावी
**तोडगा** – शिंदे समितीला तालुकास्तरावर कार्यालयासाठी जागा देण्यात आली आहे. वंशावळ समिती गठीत करण्यात येईल.
**मागणी ७** – मोडी लिपी, फारसी लिपीचे अभ्यासक घेऊन नोंदी शोधण्याचं काम करा
**तोडगा** – अभ्यासक दिल्यास शासकीय मानधनावर आम्ही तात्काळ ते काम करू. मात्र मानधन दिले नाही तरी चालेल आम्हाला नोंदी शोधण्याचा अधिकार द्या, पैसे नको, कुठल्याही राज्यातील, जिल्ह्यात जाऊन नोंदी शोधू.
**मागणी ८** – मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर काढा
**तोडगा** – सदर प्रक्रिया किचकट असल्याने आम्हाला १ महिन्याची मुदत द्या असं सरकारने सांगितले. मात्र २ महिने घ्या परंतु जीआर काढा असं जरांगे पाटील यांनी सरकारला वेळ दिला. सगेसोयरेबाबत ८ लाख हरकती आल्या आहेत. त्याचा आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे मराठा-कुणबी एकच हा जीआर काढण्यासाठी २ महिन्याची मुदत सरकारला देण्यात आली आहे.

## पश्चिम महाराष्ट्राला दिलासा
### सातारा गॅझेट लागू होणार...

**मुंबई :** सातारा संस्थानच्या गॅझेटियरमध्ये पश्चिम महाराष्ट्र पूर्ण येतो आणि सातारा गॅझेटियर पुणे, औंध गॅझेटियरवरील नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत मनोज जरांगेंनी सरकारकडे मागणी केली होती. अखेर या गॅझेटियरच्य अंमलबजावणीस सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. मात्र काही किचकट गोष्टींमुळे यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीने १५ दिवसांचा कालावधी मागितला आहे. ज्यावर जरांगेंनी महिनाभराची मूदत देतो असे म्हटले आहे. सरकारने सांगितलंय की, सातारा संस्थान पुणे व औंध संस्थान गॅझेटियरची अंमलबजावणी करण्याबाबत कायदेशीरबाबी तपासून जलदगतीने निर्णय घेण्यात येईल.

सातारा गॅझेट हा एकप्रकारे सातारा जिल्ह्याशी संबंधित अधिकृत दस्तऐवज आहे. ज्यात सरकारी अधिसूचना, नियम, आदेश आणि माहिती प्रकाशित करण्यात आली आहे. याशिवाय, सातारा जिल्ह्यातील जमीन व्यवहार, शासकीय योजना, निवडणूक अधिसूचना, आणि इतर कायदेशीर बाबींची माहिती देखील देण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यातील काही मराठा समाजाच्या नोंदी कुणबी म्हणून सातारा गॅझेटमध्ये असू शकतात, ज्याचा उपयोग आरक्षणासाठी पुरावा म्हणून केला जातो.

गॅझेट हे शासनाचे अधिकृत राजपत्र असते. हे गॅझेट स्थानिक स्तरावर जिल्ह्याच्या प्रशासकीय आणि कायदेशीर कामकाजासाठी खासकरुन वापरले जाते. सातारा गॅझेट हे सातारा जिल्ह्याच्या स्थानिक प्रशासकीय आणि कायदेशीर बाबींसाठी प्रकाशित केले जाते.

याचबरोबर हैदराबाद गॅझेट हा निझाम काळातील अध्यादेश असून, मराठवाडा, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांशी संबंधित आहे. मराठा आरक्षणाच्या संदर्भात मराठा-कुणबी नोंदींसाठी याचा उल्लेख अनेकदा केला जातो.

### झापुक । zupuk

**देऊन दिले**
**पण ताणून दिले**
**तो पर्यंत सारेच**
**कोलमडले**
**श्रेय घेण्यासाठी सारा**
**आटापिटा झाला**
**सर्वसामान्य माणूस मात्र**
**भरडून निघाला**

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

### माझं आणि फडणवीसांचं वैर संपलं..!

हैद्राबाद गॅझेटचा जीआर हातात आल्यानंतर मनोज जरांगे यांनी सरकारचे आभार मानले. यावेळी त्यांनी सांगितले की, विखे-पाटील, सामंत, सरनाईकसाहेब हे सर्वजण इथे आले आहेत. माझी एक इच्छा आहे या सर्व कामाचे श्रेय विखे-पाटील यांना जातेच पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपोषण सोडायला यावे. तुमचं आणि आमचं वैर संपलं.' तसंच, 'मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी आजचा सुवर्ण क्षण आहे.', असे मनोज जरांगे यांनी सांगितले. 'चांगल्या कामासाठी आमच्या घरी स्वागत राहिल.', असे विखे पाटील यांनी जरांगेना सांगितले.



## निलंबित पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे यांची आत्महत्या



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** एप्रिल महिन्यात निलंबित झालेले माजी पोलिस निरीक्षक सुनील नागरगोजे यांनी अंबाजोगाई येथील भाड्याने रहात असलेल्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी रात्री ८ वाजता उघडकीस आली आहे.

परळी तालुक्यातील नागदरा हे सुनील नागरगोजे यांचे मूळ गाव आहे. मात्र अनेक वर्षांपासून कुटुंबियांसह अंबाजोगाईत वास्तव्यास होते. परभणी, लातूर, बीड येथे त्यांनी काम केले होते. लातूर येथे त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचा पदभार सांभाळला होता. परभणी येथे त्यांनी एका पोलिस अधीक्षकांना शिविगाळ केली होती. त्या प्रकरणात चौकशी सुरू होती. बीडला बदली झाल्यानंतरही त्यांनी एका कर्मचा-याला शिविगाळ करून धमकी दिली होती. बीडला त्यांना नियंत्रण कक्षातच ठेवेले गेले होते. परभणीच्या प्रकरणात एप्रिल २०२५ मध्ये त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. **(पान ४ वर)**

## हैदराबाद गॅझेटियर लागू शासकीय अध्यादेश जारी

महाराष्ट्रातील मराठवाडा हा एक वैविध्यपूर्ण असा ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक ठेवा असणारा प्रदेश आहे. मराठवाड्यातील सामाजिक, भौगोलिक आणि प्रादेशिक परिस्थिती ही उर्वरीत महाराष्ट्रापेक्षा वेगळी आहे. महाराष्ट्राच्या मध्य विभागात असणारा हा भौगोलिक प्रदेश संतांची भूमी म्हणून पूर्ण देशात प्रसिध्द आहे.

२. मराठवाड्यात इतिहासकालीन प्रसिध्द अशा सातवाहन राजाने राज्य केलेले आहे. पैठण (प्रतिष्ठाण) ही त्यांची राजधानी होती. यानंतर वाकाटक, चालुक्य, यादवकालीन अशा पराक्रमी घराण्यांनी मराठवाडा आणि परिसरावर राज्य केले आहे. देवगिरीचा ऐतिहासिक किल्ला हा या राजांच्या शौर्याचे आणि सामर्थ्याचे प्रतिक म्हणून आज सुध्दा त्याच दिमाखाने उभा आहे. अशा या अतिशय प्राचीन आणि ऐतिहासिकदृष्ट्या समृध्द वारसा असणारा मराठवाडा दि.१७ सप्टेंबर, १९४८ साली भारतात विलीन झाला. या काळात या संतभूमितून औंढा नागनाथ, घृष्णेश्वर, परळी-वैजनाथ, माहूरगड, तुळजापूर, पैठण, आपेगाव, नरसी नामदेव व तेर अशी समृध्द तिर्थक्षेत्रे निर्माण झाली. जगभरात प्रसिध्द असणारे आणि वैविध्यपूर्ण कलाशिल्पाने नटलेले अजिंठा व वेरूळ येथील लेणी आहेत.

३. मराठवाड्याच्या ऐतिहासिक भूमितून संतश्रेष्ठ नामदेव, निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, गोरा कुंभार, जनाबाई, जगमित्र नागा, एकनाथ, सेना न्हावी व जनार्दन स्वामी अशा महनीय संतांनी या भूमिमध्ये सहिष्णूता, भागवत धर्माचा प्रसार, भूतदया, समानतेचा संदेश दिला आहे. तसेच श्री गुरू गोविंद सिंघजी यांची समाधी नांदेड येथे असून त्याठिकाणी शीख धर्मीय मोठ्या प्रमाणात दर्शनाकरिता येत असतात. या कारणाने मराठवाड्यात आजसुध्दा सर्व धर्म समभावाची वीण कायम आहे. मराठवाड्यातून मुख्यतः गोदावरी, पूर्णा व मांजरा या नद्या वाहतात. या नद्याने यांतील जनजीवन काही प्रमाणात समृध्द केले आहे. गोदावरी ही महाराष्ट्राची जीवनदायिनी असून मोठ्या प्रमाणात नागरी समूह या नदीच्या तिरावर वसलेला आहे.

४. असा हा मराठवाडा महाराष्ट्रात दि. ०१ नोव्हेंबर, १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई प्रांतात सामील झाला आणि दि.०१ मे, १९६० पासून मराठवाडा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग बनला आहे. तत्कालिन निजाम सरकारमध्ये मराठवाडा विभागाची प्रशासकीय रचना ही निजाम सरकार नियंत्रित होती. अशा परिस्थितीमध्ये तत्कालीन इंग्रज राजवट व निजाम राजवट यांच्या प्रशासकीय पध्दतीमध्ये बऱ्याच अंशी तफावत आढळते. या संपन्न अशा मराठवाड्यात अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात आरक्षणाच्या अनुषंगाने आंदोलने सुरू झाली आहेत. त्यासाठी या भागातील कुणबी, कुणबी मराठा तसेच मराठा कुणबी यांच्या नोंदी शोधण्यासाठी आणि या भागातील सदरहू जनतेला न्याय देण्याच्या अनुषंगाने दि.०७ सप्टेंबर, २०२३ रोजी मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीला मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये नोंदी शोधण्याकरिता आवश्यक ती यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली.

समितीने मराठवाड्यातील विविध शासकीय कार्यालयातील उपलब्ध असणारी सर्व प्रकारची कागदपत्रे तपासून आतापर्यंत न सापडलेल्या कुणबी जातीच्या बऱ्याच प्रमाणात नोंदी शोधल्या आहेत. उक्त समितीमार्फत मराठवाड्यात जिल्हानिहाय भेटी/दौरे करून बैठका घेण्यात आल्या. आवश्यकतेनुसार हैदराबाद गॅझेट आणि तत्कालीन काळात निजाम सरकारची राजधानी याकारणाने समितीने दोन वेळा हैदराबाद येथील पुराभिलेख विभागास आणि महसूल विभागास भेटी देऊन सुमारे ७ हजार पेक्षा अधिकची कागदपत्रे अभ्यासाकरिता प्राप्त करून घेतली आहेत.

तसेच, देशाची जनगणना आणि त्याअनुषंगाने तत्कालीन निजाम सरकारकडील कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याकरिता दिल्ली येथील जनगणना कार्यालय आणि त्यांच्या ग्रंथालयास भेट देऊन अधिकची कागदपत्रे उपलब्ध करून घेतली आहेत. याचदरम्यान दिल्ली येथील राष्ट्रीय पुराभिलेख कार्यालयात भेट देऊन तत्कालीन निजाम सरकारकडील कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय मराठवाड्यातील ज्यांच्याकडे वैयक्तिक कागदपत्रे जी जातीची प्रमाणपत्रे मिळण्यासाठी उपयोगी ठरतील ती कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही केलेली आहे.

मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीने गेल्या दोन वर्षात सातत्याने मराठवाड्यात आणि महाराष्ट्रातील कुणबी नोंदी शोधण्याकरिता मोठ्या प्रमाणात क्षेत्रिय यंत्रणेमार्फत कार्यवाही केलेली आहे. मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीने आतापर्यंत विविध शिफारशीसह सादर केलेल्या अहवालांमधील सर्व शिफारशी शासनाने स्विकारल्या आहेत व याआधारे विविध विभागामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे. यापुढेही सदर समितीने दिलेल्या अहवालांवर योग्य कार्यवाही केली जाणार आहे.

५. तथापि, मराठवाड्यामध्ये यापेक्षा बऱ्याच प्रमाणात कुणबी-मराठा समाज असून त्यांना जात प्रमाणपत्रे मिळण्याकरिता हैदराबाद गॅझेट लागू करण्यात यावे, अशा प्रकारची मागणी वारंवार होत आहे. मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीस हैदराबाद, सातारा व बॉम्बे गॅझेट लागू करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देशीत करण्यात आले असून, त्याकरिता समितीस दि.३१ डिसेंबर, २०२५ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने हैदराबाद व दिल्ली येथे दौरे करून तत्कालीन निजाम सरकारमधील पाच जिल्ह्यांची (औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड व उस्मानाबाद) माहिती प्राप्त करून घेतली आहे व सदरहू कागदपत्रांचा अभ्यास करण्यात येत आहे. तत्कालीन निजाम सरकारमध्ये कुणबी जातीस कापू या नावाने ओळखले जाई, त्यांचा मुख्य व्यवसाय शेती करणे हा होता. या कागदपत्रांमध्ये / गॅझेटिअरमध्ये (सन १९२१ व सन १९३१) कुणबी/कापू अशा नोंदी आहेत. यापुर्वी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या कलम १८ च्या पोट कलम १ मध्ये आणि नियम, २०१२ च्या नियम ४ मधील उप-नियम (२) मधील खंड (च) मध्ये (च) नंतर विविध अभिलेखांचा समावेश करण्याकरिता अधिसूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२४, दि.१८ जुलै, २०२४ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार, मराठा समाजास कुणबी, कुणबी-मराठा, मराठा कुणबी जातीची प्रमाणपत्रे मिळण्यास उपयोग झालेला आहे. आता, मराठा समाजास जात प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रक्रियेत अधिक सुलभता यावी, याकरिता शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :- संदर्भाधीन वाचा क्र.१ व क्र.३ अन्वये जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करणे याकरिता सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ व त्याअंतर्गत कार्यपध्दती निश्चितीकरिता नियम तयार करण्यात आलेले आहेत. यामध्ये हैद्राबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी चौकशी करुन सक्षम प्राधिकाऱ्यास सहाय्य करण्याच्या दृष्टीने अहवाल देण्यासाठी गावपातळीवर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे: -

समिती सदस्यः-
१. ग्राम महसूल अधिकारी
२. ग्रामपंचायत अधिकारी
३. सहायक कृषी अधिकारी

मराठा समाजातील भुधारक तसेच भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईने शेती करत असलेल्या व्यक्तींकडे शेत जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांनी दि.१३.१०.१९६७ पूर्वी ते किंवा त्यांचे पूर्वज संबंधित स्थानिक क्षेत्रांमध्ये राहत असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.या प्रतिज्ञापत्राच्या आधारे दिलेल्या अनुषंगिक पुराव्याचे सक्षम प्राधिकारी यांनी स्थानिक चौकशी करून खातरजमा करावी. अशा स्थानिक चौकशीमध्ये संबंधित जातीचा दावा करणाऱ्या व्यक्तीचे गावातील / कुळातील नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास व दावा करणारा व्यक्ती हा त्यांच्या नातेसंबंधातील/कुळातील असून कुणबी असल्याचे प्रतिज्ञापत्र देण्यास ते तयार असल्यास, तसे प्रतिज्ञापत्र घेऊन उपरोक्त नमूद गावपातळीवरील स्थानिक समिती, वंशावळ समितीच्या सहाय्याने आवश्यक ती चौकशी करेल. त्या चौकशीच्या आधारे सक्षम प्राधिकारी अर्जदारास कुणबी जातीचा दाखला देण्याबाबत निर्णय देतील.

## संपादकीय..

# सत्ताकेंद्री बिहारी यात्रा

भारतीय राजकारणाच्या सारीपाटावर आतापर्यंत यात्रा हा प्रकार अनेकदा 'गेमचेंजर' ठरला आहे. राजकारण उत्तरेकडचे असो वा नाहीतर दक्षिणेकडचे, थेट लोकांपर्यंत पोचण्यासाठी नेतेमंडळींकडून यात्रा आयोजिण्यात येतात. विधानसभा रणसंग्रामाला सामोरे जाणाऱ्या मगध भूमीचे राजकारण महाआघाडीच्या ( राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसच्या) 'मतदार अधिकार यात्रे'मुळे ढवळून निघाले. त्याला कारणही तसेच होते. ऐन निवडणुकीच्या तोंडावर निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदारयाद्यांच्या सखोल फेरपडताळणीची हाती घेतलेली मोहीम. या मोहिमेच्या माध्यमातून मतचोरी होत असल्याचा आरोप विरोधकांनी केला.

खरे तर मतदारयाद्यांच्या फेरपडताळणीच्या आयोगाकडून हाती घेण्यात आलेल्या या मोहिमेत नवे काही नव्हते. यात आयोगाचे चुकले असेल काय, तर ते म्हणजे टायमिंग आणि ओळख पटविण्यासाठीच्या दस्तावेजांवरून घालण्यात आलेला गोंधळ. पण त्यातून व्यवस्थात्मक सुधारणा म्हणून ठोस काही आपल्या हाती लागले, असेही म्हणता येणार नाही. अखेरीस याच यात्रेत शेवटच्या टप्प्यात पंतप्रधानांना देण्यात आलेले शिव्याशाप प्रचाराची पातळी आणखी खाली आणणारे ठरले. गर्दी खेचण्यात मात्र राहुल गांधी आणि तेजस्वी यादव ही जोडी यशस्वी ठरली. आता या गर्दीचे मतांमध्ये रुपांतर होते का, याचे उत्तर निवडणुकीचे निकाल देतील.

बिहारच्या सासाराम जिल्ह्यातून १७ ऑगस्ट रोजी निघालेल्या या यात्रेने १४ दिवसांचा प्रवास करत २४ जिल्ह्यांतील ५० मतदारसंघ पिंजून काढले. तब्बल तेराशे किलोमीटरचा पल्ला गाठणाऱ्या या यात्रेचा आज (ता.१) पाटण्यात मोठ्या सभेने समारोप होईल. दरम्यान तेजस्वी यादव यांनी याच टप्प्यावर 'इंडिया आघाडी'चे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून स्वतःचे नाव जाहीर केले आहे. त्यांनी नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री आणि मंत्री तसेच बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून काम केले आहे. पाच वर्षांपूर्वी विधानसभा निवडणुकीतील त्यांच्या झंझावाती प्रचारासमोर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीशकुमार ही देशाच्या राजकारणातील सर्वांत अनुभवी जोडी निष्प्रभ झाल्यासारखी दिसत होती. पण तेजस्वी यादव यांनी काँग्रेससोबत केलेली जागावाटपातील चूक त्यांना भोवली. विधानसभेच्या २४३ पैकी राष्ट्रीय जनता दलाने १४४ जागा लढविल्या.

पण ताकद नसलेल्या काँग्रेससाठी ७० जागा सोडणे त्यांना महागात पडले होते. केवळ १९ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसने तेजस्वी यादव यांना अपेक्षित असलेली साथ दिली नाही. त्यांचा पक्ष ७९ जागांसह विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरला. पण राजद-काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या 'महाआघाडी'ला बहुमताचा जादुई आकडा गाठण्यासाठी १२ जागा कमी पडल्या. ते आता जागावाटपात अशी चूक पुन्हा करणार नाहीत. यावेळी राहुल गांधी यांच्या 'मतदार अधिकारयात्रे'मुळे बिहारमध्ये काँग्रेसची कामगिरी सुधारू शकते. पण तेजस्वी यादव यांच्यापुढे केवळ राष्ट्रीय लोकशाही आघाडीचेच आव्हान नाही, तर त्यांचे सख्खे भाऊ तेजप्रताप यादव आणि जनसुराज्य पक्षाचे प्रशांत किशोर यांच्याकडून होणाऱ्या संभाव्य मतविभाजनाचेही आव्हान असेल. याआधी राजद म्हटले की केवळ मुस्लिम (एम) आणि यादव (वाय) हे समीकरण डोळ्यासमोर यायचे; पण राहुल आणि तेजस्वी यांच्या जोडगोळीने त्याला अधिक व्यापक रूप देण्याचा प्रयत्न करत ते पिछडा, दलित आणि अल्पसंख्याक या पातळीवर आणून ठेवले. राहुल गांधी यांच्या मतचोरीच्या आरोपांनी तर थेट महाराष्ट्राचे राजकारणही ढवळून निघाले. या प्रचारयात्रेचे आणखी एक वेगळेपण म्हणजे काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीतील (यूपीए) महत्त्वाच्या नेत्यांनी तिला लावलेली हजेरी. तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन असो की समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, दोन्ही नेते राहुल अन् तेजस्वी यांच्याबरोबरीने प्रचाराच्या मैदानात उतरले होते.बिहारमधील कथित मतचोरीचा मुद्दा आता देशव्यापी करण्याचा निर्धार राहुल गांधी यांनी बोलून दाखविला आहे. २०१५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सरसंघचालकांनी आरक्षणाबाबत केलेले विधान गाजले होते

. त्यावेळी लालूप्रसाद-नितीश कुमार यांच्याजोडीने भाजपला धोबीपछाड दिला होता. आरक्षणाच्या मुद्यावरून लालूप्रसादांनी संघावर टोकाचे वार केले होते. आता विरोधकांनी कथित मतचोरीचे भांडवल केल्याचे दिसते. याशिवाय कायदा-सुव्यवस्था आणि बेरोजगारी हे मुद्दे प्रकर्षाने मांडले जातील. तेजस्वी यादव यांना मिळणाऱ्या तरुणांच्या प्रतिसादामागे रोजगाराचा प्रश्न आहे. महाराष्ट्र असो वा बिहार, विविध राज्यांत रोजगारसंधींच्या अभावाने असंतोष साचत आहे. त्याचा उद्रेक विविध आंदोलनांच्या माध्यमातून होताना दिसतो. मतचोरीसारखे विषय राजकीय पक्षांना उपयोगाचे वाटत असले तरी लोकांसाठी महत्त्वाचे आहेत तो रोजी-रोटी आणि सुरक्षेचे प्रश्न. याचे भान ठेवले नाही, तर बिहारमधील निवडणुकीत अशांना फटका बसू शकतो.

## वैजापूरात उभारली कुबेरेश्वर धाम महादेवाची प्रतिकृती

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** यंदा वैजापूर शहरातील विविध सार्वजनिक गणेश मंडळानी अतिशय भव्य व आकर्षक गणेश मूर्तीची प्रतिष्ठापणा केली आहे. त्यासाठी वेगवेगळ्या थीमचा वापर करत आकर्षक आरास व सजावट करण्यात आल्याने हे देखावे पाहण्यासाठी पहिल्या दिवसांपासून गणेश भक्तांनी रस्ते फुलायला लागले आहेत. म्हसोबा मित्र गणेश मंडळाने म्हसोबा चौकात साकारलेला शिवकथाकार पंडित प्रदीप मिश्रा यांच्या सिहोर येथील कुबेरेश्वर धाम महादेव मंदिराचा देखावा सर्वांचे आकर्षण ठरला आहे. कुबेरेश्वर धाम महादेव मंदिराची अगदी हुबेहूब प्रतिकृती उभारण्यात आली असून या मंदिरात बाप्पाची देखणी मूर्ती स्थापित करण्यात आली आहे. याशिवाय स्टेशन रस्त्यावरील अनेक मंडळानी लक्षवेधी सजावटी केल्या आहेत. छ. शिवाजी महाराज पुतळा परिसरात महायोद्धा प्रतिष्ठाण, वैजापूरचा राजा यां मंडळाने मंदिराची विद्युत रोषणाईने झळकत असलेली प्रतिकृती उभारली असून त्यात भव्य श्री गणेश मूर्तीची स्थापना केली आहे. तसेच रामराज्य ग्रुपने अयोध्या येथील राम मंदिराची प्रतिकृती उभारली आहे. या परिसरात असलेल्या शिवस्य गणेश मंडळ, बालराज ग्रुप, मोरया ग्रुप, हिंदू प्रतिष्ठाण ग्रुप या मंडळानीही आकर्षक सजावट करून गणेश भक्तांचे लक्ष वेधले आहे. हिंदू प्रतिष्ठाण ग्रुपने हिरवाईत गणेश मूर्तीची स्थापना करून पर्यावरणपूरक गणेशाचा संदेश दिला आहे. मोरया गणेश मंडळानेही यंदा जंगलात गणेश मूर्तीची स्थापना केल्याचा देखावा सादर केला आहे.



## पार्किंग नियमांची अंमलबजावणी सुरु



**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** गणेशोत्सवात वाहतुकीचा कोळंबा होऊ नये यासाठी अस्ताव्यस्त पार्किंगवर पोलिसांनी कारवाई सुरू केली. येथील मेनरोड, शिवाजी रोड येथे गाड्यांची पाहणी करताना अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, पोलीस निरीक्षक नितिन देशमुख यांच्यासह पोलीस पथक. (छाया अमोल कदम)

## सामान्यांची आर्थिक पिळवणूक सहन केली जाणार नाही : आ. काळे

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :-** कोपरगाव शहरातील विविध शासकीय कार्यालयात सर्वसामान्य नागरीकांची शासकीय कामात अडवणूक केली जात असून काही शासकीय अधिकाऱ्यांकडून पैशाची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. हा प्रकार गंभीर असून सर्वसामान्य नागरिकांची कोणत्याही शासकीय कार्यालयात होणारी आर्थिक पिळवणूक सहन केली जाणार नाही असा ईशारा आ.आशुतोष काळे यांनी शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिला आहे. आ.आशुतोष काळे यांनी म्हटले आहे की, शासनाच्या कल्याणकारी योजना सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचायला हव्यात, पण या प्रक्रियेत नागरिकांचे आर्थिक शोषण होता कामा नये.नागरिकांना देण्यात येणारी शासकीय सेवा पारदर्शक, जलद



आणि लोकाभिमुख असली पाहिजे. नागरीकांना आवश्यक असलेली कागदपत्रे ठरलेल्या शासकीय नियमानुसार वेळेत दिली गेली पाहिजे.वेळेच्या अगोदर कोणताही नागरिक कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याकडे कागदपत्रांची मागणी करीत नाही. मात्र आर्थिक हव्यासापोटी जर सर्व सामान्य नागरीकांना वेठीस धरले जात असेल तर अशा अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही. शासकीय यंत्रणेला जाब विचारणारे कोणी नाही असे समजता कामा नये. मी शासकीय अधिकाऱ्याच्या कारभारावर नजर ठेवून आहे त्यामुळे कोणीही अधिकारी चुकीचे काम करतांना आढळल्यास त्या अधिकाऱ्याला होणाऱ्या परिणामांना सामोरे जावे लागेल. सर्वसामान्य जनतेच्या अडचणी दूर होवून त्यांचे जीवन सुखकर व्हावे यासाठी शासन विविध समाजोपयोगी योजना व उपक्रम राबवीत असते. या योजना संबंधित शासकीय कार्यालयाच्या माध्यमातून तळागाळातील सर्व सामान्य गरजू जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत हा शासनाचा मुख्य उद्देश असतो. मात्र या उद्देशाला काही शासकीय अधिकारी हरताळ फासून नागरीकांची आर्थिक पिळवणूक करीत आहे. अशा अधिकाऱ्यांना मी सोडणार नाही हे सर्व शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांनी लक्षात घ्यावे. तुम्ही जनतेच्या सेवेसाठी आहात, मालकी हक्क गाजवण्यासाठी नाही. जनतेने भरलेल्या कराच्या पैशातून सर्व शासकीय अधिकाऱ्यांचे पगार होतात याची जाणीव ठेवून जनतेच्या खिशात हात घालण्याचा प्रयत्न करू नका. यापुढे कोणत्याही कार्यालयात जर कोणत्याही नागरीकांचे काम अडवलं, पैसे मागितले तर त्याचे परिणाम वाईट होतील असा निर्वाणीचा ईशारा आ.आशुतोष काळे यांनी दिला आहे.

## तहसीलदारांच्या प्रयत्नाने २० वर्षापासून प्रलंबित रस्ता अखेर खुला



**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी I** संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द-दाढ खुर्द मार्गावरील वाल्हेकर वस्तीचा तब्बल २० वर्षांपासून बंद असलेला रस्ता अखेर खुला झाला आहे. दोन दशकांपासून रखडलेल्या या प्रश्नामुळे पाच कुटुंबांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. शेवटी जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्तक्षेपानंतर कर्तव्यदक्ष तहसिलदार धिरज मांजरे यांनी तातडीने कारवाई करत ग्रामस्थांना दिलासा दिला. गावच्या सरपंच सौ. अलकाताई गायकवाड, उपसरपंच बाबा भवर, ग्रा.प. सदस्य संजय भोसले, सोपान सोनवणे, सागर भडकवाड, सेवा सोसायटीचे संचालक दत्ता गायकवाड, दुध संस्थेचे अध्यक्ष मकरंद गुणे, कैलास गायकवाड, दिलीप मांढरे अविनाश सोनवणे संदिप सोनवणे सावकार लावरे रामा क्षिरसागर अनिल सोनवणे आदींसह ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रश्नासाठी सातत्याने प्रयत्न केले. मंत्री डॉ. विखे पाटील यांचे स्वीय सहायक बापुसाहेब गायकवाड, विखे पा. कारखान्याचे संचालक ॲड. अनिल भोसले जनसेवा कार्यालयाचे सुजित क्षीरसागर दिपक सोनवणे मनोज मेहरे यांच्या पाठपुराव्यामुळे तहसिलदार मांजरे यांनी महसूल विभागाच्या संपूर्ण यंत्रणेसह स्थळाला भेट देत पोलिस बंदोबस्तात रस्ता तात्काळ खुला केला. काटेरी झाडे काढून, खड्डे बुजवून मुरुमीकरण करत आणि पंचनामा करून रस्त्याची अंमलबजावणी करण्यात आली. या संदर्भात निवृत्ती वाल्हेकर व इतर पाच जणांनी सुमारे विस वर्षा पूर्वी तहसिलदार यांच्याकडे अर्ज दाखल केला होता व निकालही लागला मात्र निर्णयाची अंमलबजावणी होत नव्हती. मंडल अधिकारी जे. एन. पठाण, ग्राम महसूल अधिकारी बाळासाहेब बोऱ्हाडे, सोमनाथ गाडेकर, सुजित साबळे, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, पोलिस अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील पाणंद व वहीवाटीचे रस्ते खुले करण्याचा घेतलेला निर्णय या कार्यवाहीला पूरक ठरल्याचे स्पष्ट झाले. दोन दशकांपासून रखडलेला हा ऐतिहासिक रस्त्याचा प्रश्न सुटल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण पसरले असून सर्वांनी मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, तहसिलदार धिरज मांजरे, महसूल विभागाचे अधिकारी, सरपंच तसेच जनसेवा कार्यालयाचे मनःपूर्वक आभार मानले.

## मंचर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात चोरी ; चोरटे सीसीटीव्हीत कैद

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील मंचर येथील बेंडे मळा येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिरात चोरी झाली असून चोरट्यांनी अंदाजे १ लाख रुपये किंमतीच्या स्वामींच्या चांदीच्या पादुका चोरून नेल्या आहेत. सदर घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली असून दोन चोरट्यांनी कटावणीच्या सहाय्याने दरवाजा तोडून पादुका चोरून नेल्याचे निष्पन्न झाले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की मंचर येथील बेंडेमळा येथे स्वामी समर्थ महाराज यांचे मंदिर असून मंदिरात दररोजच्या आरतीचे काम प्रगती बेंडे या करतात नेहमीप्रमाणे त्या रविवारी सायंकाळी आरती करून मंदिराच्या दरवाजा लावून घरी गेल्या होत्या. दुसऱ्या



दिवशी त्यांना स्थानिक नागरिकांनी मंदिराचा दरवाजा उघडा असल्याचे सांगितले ,त्यावेळी त्यांनी मंदिरात येऊन पाहिले असता कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी कटावणीच्या साह्याने मंदिराच्या गाभाऱ्याचे दरवाज्याची कुलूप कडी तोडून पादुका चोरून नेल्याचे लक्षात आले. तसेच दानपेटी ही फोडण्याचा प्रयत्न केला मात्र दानपेटी साखळीने बांधलेली व कुलूप लावलेली असल्यामुळे त्यातील रक्कम चोरून नेता आली नाही. स्थानिक नागरिकांनी मंदिरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता रविवारी पहाटे तीन वाजताच्या दरम्यान एक महिला व एक पुरुष चोरी करताना दिसून येत आहे. याबाबत बेंडे मळा येथील नागरिकांनी मंचर पोलीस ठाण्यात माहिती दिली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान मंचर बेंडे मळा येथे काही दिवसांपूर्वी रस्त्याने पायी जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरण्याचा प्रयत्न झाला असल्याचे स्थानिक रहिवासी प्रगती बेंडे यांनी सांगितले असून याबाबत नगरपंचायत प्रशासन यांना वारंवार सांगूनही ते दुर्लक्ष करत असून पोलीस प्रशासनाने या परिसरात गस्त वाढवावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांची देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महाराष्ट्राचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी कृषी महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास भेट देत प्रकल्पातील विविध उपक्रमांची पाहणी केली. भेटीदरम्यान त्यांनी शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांशी संवाद साधत केंद्रातील गाईंच्या देशी जातींबाबत सविस्तर माहिती घेतली. त्यांनी प्रकल्पातील दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या देशी गायी, नवीन पर्यावरण पूरक गोठे, गोबर गॅस प्रकल्प, गोपरीक्रमा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने राबविण्यात येणाऱ्या संशोधन व प्रशिक्षण उपक्रमांचे कौतुक केले. प्रकल्पात उभारण्यात येत असलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्स मध्ये अद्यावत गायींचे गोठे, सायलो बंकर, बायोगॅस युनिट, कंपोस्टिंग आणि स्टोरेज युनिट्स, प्रयोगशाळा, शेतकरी वसतीगृह, प्रशिक्षण हॉल, प्रशासकीय इमारत, सेल्स काउंटर तसेच देशी गाईंच्या प्रचार प्रसारासाठी गो-पर्यटन केंद्र इत्यादी सुविधा आगामी काळात उपलब्ध होणार आहेत. या बांधकामाची पाहणी करताना कृषिमंत्र्यांनी



संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. या प्रसंगी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, राजर्शी छत्रपती शाहू महाराज शासकीय कृषी महाविद्यालय, कोल्हापूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश कांबळे, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. समीर ढगे, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कंखरे तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे विविध शास्त्रज्ञ या वेळी उपस्थित होते.प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी कृषिमंत्र्यांना प्रकल्पाची संपूर्ण माहिती सादर केली. कृषिमंत्री भरणे यांनी केंद्राच्या कार्याची मनःपूर्वक प्रशंसा करून प्रकल्पाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## गणेश उत्सवातून समतेची भावना वाढीस : बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या संगमनेर शहरात पौराणिक, ऐतिहासिक व विविध आकर्षक देखाव्यांसह गणेश मंडळांनी मोठे आरस केले आहे. हे आरस पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी शहर व ग्रामीण भागात विविध गणेश मंडळाच्या आरतींना भेट दिली. याच बरोबर या गणेशोत्सवाच्या आनंदपर्वातून समतेची भावना वाढीस लागत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे. संगमनेर शहरात राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते विविध ठिकाणी गणेश मंडळांची आरती झाली. तसेच अनेक देखावे नागरिकांना पाहण्यासाठी खुले करण्यात आले. यावेळी समवेत मा. आ. डॉ. सुधीर तांबे, सौ. कांचनताई थोरात, सौ.दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ.जयश्रीताई थोरात, दिलीपराव पुंड,विश्वासराव मुर्तडक,सोमेश्वर दिवटे,निखिल पापडेजा, आदींसह संगमनेर शहरातील अनेक महिला पदाधिकारी युवक व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, यावर्षी राज्यात सर्वत्र चांगला पाऊस झाला आहे. धरणे भरली आहेत. परंतु अजूनही ज्या भागांमध्ये पाऊस नाही त्या भागामध्ये पाऊस व्हावा. गणेशोत्सवाला मोठी परंपरा असून हा उत्सव आता देशाचा झाला आहे. याचबरोबर बाहेरील देशांमध्ये मोठ्या आनंदाने हा उत्सव आता साजरा होतो आहे. संगमनेर मध्ये सर्वजण एकत्र येऊन दहा दिवस आनंद साजरा करतात. सर्वांनी एकत्र येऊन समतेची भावना वाढीस लागावी. प्रत्येकाने एकमेकांच्या सुःख दुःखात सहभागी व्हावे. असा या सणाचा उद्देश आहे.




यावर्षी संगमनेर शहरांमध्ये विविध गणेश मंडळांनी देखावे अत्यंत सुंदर केले आहे. विद्युत रोषणाईसह सुंदर आरस असलेले देखावे पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. सर्व नागरिकांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन करताना गणेश मंडळातील तरुणांनी नागरिकांच्या आरोग्याला हानी होणार नाही याकरता ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण न करता आरोग्यवर्धक गणेशोत्सव साजरा करावा. तसेच गणेश विसर्जन करताना तरुणांनी अतिउत्साह न दाखवता दुर्घटना टाळण्यासाठी संयम बाळगावा. पर्यावरण पूरक व स्वच्छतेचा संदेश देणारा या वर्षीचा गणेश उत्सव ठरावा असेही ते म्हणाले. तर आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, गणेश उत्सव काळामध्ये तरुणांचा मोठा उत्साह असतो. संगमनेरकर सर्व एकरूप होऊन हा गणेशोत्सव साजरा करत आहेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम संगमनेर मध्ये होत आहेत. एकतेची सुरक्षिततेची व समृद्धीची ही परंपरा आपल्याला पुढे घेऊन जाण्यासाठी प्रत्येक तरुणाने सामाजिक बांधिलकी ठेवून काम करावे असे आवाहन केले.

## ३८ वी नॅशनल लेवल एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी स्पर्धा रामलीला लॉन्स नेवासा येथे संपन्न

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**हंडिनिमगांव:-** एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी ३८ वी नॅशनल लेवल स्पर्धा रामलीला लॉन्स नेवासा येथे पार पडली. या स्पर्धेत राज्यातील १०२१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

आपल्याला जर कुठल्याही क्षेत्रात यश संपादन करायचे असेल तर त्यासाठी महत्त्वाचे असते सातत्य,जिद्दीचे प्रयत्न आणि नियमितता असे आवाहन यावेळी प्रदेश चिटणीस भाजपा महिला मोर्चा महा. राज्य संस्थापिका अमृता श्रीकांत नळकांडे यांनी केले.

या वेळी वेळी निवासी नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे ,. सुरेश पाटेकर , सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती नेवासा, बाळासाहेब कासार , कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती नेवासा, वैद्य श्रद्धा पोलीस उपनिरीक्षक, अनिल गव्हाणे , सोपानराव काळे , चि. साईराज सरडे, एव्हरेस्ट अबॅकस संचालिका कल्पना घडेकर, अशोक घडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

फक्त पाच मिनिटात गणितीय क्रिया करण्याच्या या स्पर्धेत सलाबतपुर येथील २५ विद्यार्थी सहभागी झाले. आदिती औताडे व श्रुती दारकुंडे या विद्यार्थिनींनी चॅम्पियन पारितोषिक मिळवले. तसेच १५ विद्यार्थ्यांनी पहिल्या दहा मध्ये स्थान मिळवले. यामध्ये अरफान पटेल प्रथम, तेजस कोहक, आदिती मते, श्रद्धा पुंड, द्वितीय , संस्कृती कोहक, सोहम मेहेत्रे, चौथे,





अक्षय आढाव पाचवे, आदित्य औताडे, श्रेया निकम, सहावे, अनुष्का दारकुंडे,विराज भांड, सातवे, भाग्येश आढाव आठवे, श्रेया दारकुंडे हिने दहावे पारितोषिक मिळवले.

तसेच शिवराज दारकुंडे, तीर्थराज गाडेकर, साई दुधाळ, रुद्र निकम या विद्यार्थ्यांनी बेस्ट आणि दिव्यांश औताडे, अथर्व पवार, कृष्णा जाधव, ज्ञानदा भांड, अनन्या भांड, साहिल सकट यांनी एक्सलंट पारितोषिक मिळवले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सलाबतपुर येथील विधाटे अर्चना यांचे मार्गदर्शन लाभले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# फडणवीसांकडून लाडक्या बहिणींची थट्टा

## आश्वासन देऊनही लाभांमध्ये वाढ नाही; बहिणींमध्ये नाराजीची भावना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरूच राहील, असे आश्वासन देतानाच या योजनेच्या मासिक लाभातही वाढ करण्याची तत्कालीन उपमुख्यमंत्री व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केलेली घोषणा आता फसवी निघाली आहे.

मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत शिर्डीत गेल्या वर्षभरापूर्वी आयोजित महामेळाव्यात फडवणीस यांनी घोषणा केली होती. यावेळी जिल्ह्यातील आमदार खासदार विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तब्बल वर्षभरानंतरही लाडक्या बहिणींना फडवणीस या संदर्भात दिलासा देऊ शकले नाहीत.

तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात लाडकी बहीण योजना मोठया डामडौलालाने सुरू करण्यात आली. ती रडत रखडत चालू आहे. या योजनेमुळे मात्र अर्थव्यवस्था कोलमडली आहे. राज्याच्या व्यवस्थेवर या योजनेचा



मोठा ताण पडत आहे. घोषणे वेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार मोनिका राजळे आमदार अशुतोष काळे, सदाशिव लोखंडे, डॉ. सुजय विखे, शालिनीताई विखे या प्रमुख राज्यकर्त्यांसह अनेक वरिष्ठ पातळीवर अधिकारी देखील उपस्थित होते. लाडकी बहीण योजनेसाठी जिल्ह्यातून ११ लाख महिलांनी अर्ज केले होते. निवडणुकीच्या धामधुमीत कसलाही निकष न लावता महायुती सरकारने सरसकट या योजनेचा लाडक्या बहिणींना लाभ दिला मात्र निवडणूक संपताच वेगवेगळे निकष लावत त्यापासून अनेक लाडक्या बहिणींना हटविण्यात आले. अजूनही गरजू लाखो महिला या योजनेपासून वंचित आहेत. निकषात बसणाऱ्या गरजवंत लाडक्या बहिणींना शासनाने या योजनेत समाविष्ट करून घ्यावे, अशी मागणी गेल्या काही वर्षांपासून महिला करीत आहेत.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींना यापूर्वी दिलेला शब्द पाळावा तो पूर्ण करावा आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी तो अमलात आणावा अशी ही मागणी लाखो महिला करीत आहेत.

---

द•ख•ल

## मराठा आंदोलकांना शिरसगावातून शुद्ध पाणी



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव येथील मराठा बांधव यांच्याकडून मुंबई येथील आरक्षण लढ्यातील मराठा बांधव यांच्यासाठी शुद्ध पेयजल पाण्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी लहान मोठी पाणी बॉटल तसेच पाऊच या माध्यमातून व्यवस्था करण्यात आली. प्रसंगी माजी सरपंच आबासाहेब गवारे, जगदीश गवारे, नितीन गवारे, सोमनाथ गवारे, मुकुंदा गवारे, भास्कर ताके, विजू गवारे, नवनाथ टाके, शांताराम गावडे, विकास डेंगळे, महेश ताके, बाळासाहेब बकाल, अमोल ताके, नानासाहेब खंडागळे, नानासाहेब ताके, दादासाहेब सोनवणे, पिनू गवारे श्याम गवारे, उमेश ताके, काशिनाथ ताके आदी समाज बांधव यांनी मुंबईकडे जाणाऱ्या वाहनाचे पूजन केले. यापुढेही वेळोवेळी पाणीपुरवठा करणार असल्याची माहिती संयोजन समिती यांच्याकडून देण्यात आली.

## प्रवरेचे प्रा.सत्येन खर्डे सेट परीक्षा उत्तीर्ण



**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषि शास्त्र संस्थे अंतर्गत असणाऱ्या कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी येथील प्रा. सत्येन खर्डे हे नुकतेच सेट परीक्षा उत्तीर्ण झाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ.आशिष क्षीरसागर यांनी दिली आहे.

सदरची सेट परीक्षा ही पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी जून २०२५ मध्ये घेतलेली होती. त्यामध्ये प्रा.सत्येन खर्डे हे व्यवस्थापन या विषयातून उत्तीर्ण झाले आहे. प्रा. सत्येन खर्डे यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, पद्मश्री डॉ विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ.सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील, प्रवरा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्कर खर्डे पाटील, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी डॉ.शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ.उत्तमराव कदम आदींनी अभिनंदन केले आहे.

---

# श्रीरामपुरात पोलिसांकडून वाहनांची तपासणी

## अप्पर पोलीस अधीक्षकांनी स्वतः रस्त्यावर उतरत केली कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरात विविध घटनेनंतर श्रीरामपूर पोलीस अलर्ट मोडवर आले असून शहरातील चौका चौकात उभ्या असणाऱ्या वाहनांची तपासणी पोलीस प्रशासनाकडून करण्यात आली.

अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्यासह पोलीस कर्मचारी सोमवारी सकाळपासूनच रस्त्यावर उतरून बोगस वाहनांवर कारवाई करताना दिसले. ज्या मोटरसायकली ना नंबर नाही अशा मोटर सायकल वर कारवाई करण्यात आली. याशिवाय नंबर ऐवजी भाऊ दादा बाप यासारखे अक्षर टाकणाऱ्या अनेक



मोटरसायकलींवरही कारवाई करण्यात आली. काल दिवसभरात श्रीरामपूर शहर पोलिसांकडून अनेक गाड्यांवर कारवाई करण्यात आली. अनेकदा श्रीरामपूर शहरात आणि परिसरात गंठण चोरीचे प्रकार होतात या चोर यामध्ये वापरल्या जाणाऱ्या गाड्यांना अनेकदा नंबर प्लेट नसते नंबरच्या जागेवर काहीतरी अक्षर लिहिलेले असतात त्यामुळे या गाड्या सापडत नाही त्यामुळे आरोपीही पळून जाण्याच्या यशस्वी होतात. अशाच प्रकारच्या विना नंबरच्या गाड्यांचा वापर करतात त्यामुळे नंबर नसणारे अनेक गाड्यांवर श्रीराम पोलिसांकडून काल कारवाई करण्यात आली.

---

# पुरवठा विभागातील भ्रष्ट्र अधिकाऱ्याची हकालपट्टी

## ऋषिकेश शेटे पाटील यांच्या संघर्षाला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील नागरिकांच्या सातत्यपूर्ण तक्रारींना अखेर न्याय मिळाला आहे. पुरवठा विभागातील रेशन कार्ड विभागातील भ्रष्ट अधिकारी डोळस याच्यावर कारवाई करत त्याची तात्काळ हकालपट्टी करण्यात आली आहे. ही कारवाई भाजप जिल्हा उपाध्यक्ष व युवा नेते ऋषिकेश शेटे पाटील यांच्या प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे.



नेवासा तालुक्यातून अनेक दिवसांपासून या अधिकाऱ्याविरुद्ध तक्रारी येत होत्या,नागरिकांना वेळोवेळी अडवणे, कामात टाळाटाळ करणे, वशिले लावल्याशिवाय काम न होणे, हे प्रकार सर्रास सुरू होते. ही परिस्थिती सामान्य जनतेसाठी अन्यायकारक ठरत होती.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे पाटील यांनी या भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली, पाठपुरावा केला आणि अखेर पुरवठा विभागाने संबंधित अधिकारी डोळस याला तातडीने हटवण्याचा निर्णय घेतला.नेवासा तालुक्यात कुठल्याही कार्यालयात भ्रष्टाचार खपवून घेतला जाणार नाही असे अधिकारी सापडल्यास नागरिकांनी थेट संपर्क साधावा! असा इशारा ही ऋषिकेश शेटे पाटील यांनी दिला आहे.नेवासा तालुक्यातील हा निर्णय म्हणजे जनतेच्या हक्कासाठी लढणाऱ्या नेतृत्वाच्या संघर्षाचे यश आहे. ही केवळ सुरुवात असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी नागरिकांनी दिल्या.

---

# त्रिमूर्ती ग्रामीण फार्मसी कॉलेजच्या ई-पोस्टर स्पर्धेला प्रतिसाद!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती ग्रामीण फार्मसी कॉलेजने ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राज्यस्तरीय ई-पोस्टर सादरीकरण स्पर्धा यशस्वीरित्या आयोजित केली या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जगातील फार्मसी म्हणून भारताची भूमिका यावर केंद्रित असलेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्रातील २०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते व आपले ई-पोस्टर सादर केले.या स्पर्धेत महाराष्ट्रातील फार्मसीच्या विद्यार्थ्यांच्या प्रभावी प्रतिभा आणि नाविन्यपूर्ण कल्पना प्रदर्शित झाल्या, ज्यामुळे जेनेरिक औषध उत्पादन, लस निर्मिती आणि सुलभ आरोग्यसेवेच्या प्रचारावर भारताच्या जागतिक प्रभावाची विद्यार्थ्यांची सखोल समजअधोरेखित झाली.



या राज्यस्तरीय स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांची घोषणा कॉलेजकडून करण्यात आली आहे; प्रथम पारितोषिक(१०००)-कु.माधुरी मच्छिंद्र भांडवलकर(श्री बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट, ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, फॅक्ल्टी ऑफ फार्मसी, काष्टी) द्वितीय पारितोषिक (७००)-चि.आर्यन राजीव देशमुख(शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी, ओतूर) तर तृतीय पारितोषिक (५००)-कु. गौरी अमोल दरेकर(त्रिमूर्ती ग्रामीण फार्मसी कॉलेज, त्रिमूर्तीनगर) यांनी पटकावले आहे.

पहिल्या तीन विजेत्यांव्यतिरिक्त, महाविद्यालयाने अन्य सहभागींना त्यांच्या अपवादात्मक संकल्पना आणि पोस्टर्ससाठी सन्मानित केले. त्यांच्या सर्जनशीलतेला आणि कठोर परिश्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी, या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये २०१ चे विशेष पारितोषिक देण्यात आले. ही विशेष ओळख मिळवणारे विद्यार्थी आहेत; कु. गायत्री नानासाहेब नवले(मुळा एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी,सोनई,चि. संकेत भाऊसाहेब खांडोके(डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर)कु.श्रद्धा दिनेश चक्रनारायण(पी.व्ही. बेल्हेकर कॉलेज ऑफ फार्मसी, भानसहिवरे,चि.अजित सुरेश जगदाळे (मा.श्री.बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्टचे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, फॅक्ल्टी ऑफ फार्मसी, काष्टी) कु.नंदिनी एस. फाये(सिद्धांत कॉलेज ऑफ फार्मसी, सुदुंबरे, पुणे)

या स्पर्धेचे यश भविष्यातील फार्मासिस्टमध्ये नावीन्यपूर्णता आणि ज्ञानाची भावना निर्माण करण्याच्या महाविद्यालयाच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकते असे प्रतिपादन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड.सुमती घाडघे पाटील यांनी यावेळी बोलतांना केले. तर उपाध्यक्षा ड.स्नेहलताई घाडगे पाटील,सचिव मनीष घाडगे पाटील, संयुक्त सचिव डॉ. श्रुती घाडगे-आमले पाटील, फार्मसीच्या प्रशासकीय समन्वयक डॉ.अनुराधा गोरे यांनी सहभाग्यांचे कौतुक केले.

---

# ज्ञानेश्वर आरंगळे कृतिशील विज्ञान अध्यापक पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा पब्लिक स्कूलचे ज्येष्ठ विज्ञान शिक्षक ज्ञानेश्वर आरंगळे यांना जिल्हा विज्ञान अध्यापक संघ अहिल्यानगर तर्फे कृतिशील व उपक्रमशील विज्ञान अध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अशी माहिती शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी दिली.

हा पुरस्कार विज्ञान विषयात केलेल्या भरीव योगदानाबद्दल तसेच विज्ञान विषयाच्या अध्यापनाबरोबरच



विविध वैज्ञानिक व शैक्षणिक उपक्रमातील सक्रिय सहभागाबद्दल प्रदान केला जातो. शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मधील राहाता तालुक्यातून त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली. अहिल्यानगर येथे व्ही. आर. डी. ई. व डी. आर. डी .ओ चे प्रसिद्ध शास्त्रज्ञ रोहित मोरे यांच्या शुभहस्ते त्यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रवरा पब्लिक स्कूलचे श्री ज्ञानेश्वर आरंगळे यांनी मिळवलेल्या या सन्मानाबद्दल संस्थेचे तथा जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत पाटील शाळेचे प्राचार्य डॉ बी बी अंबाडे, उपप्राचार्य के. टी. अडसूळ, पर्यवेक्षिका एम. एस. जगधने, शुभांगी रत्नपारखी यांनी अभिनंदन केले आहे.

---

मराठा आंदोलकांच्या शिदोरीसाठी..

# चिमुकल्याने दिले खाऊचे पैसे



**पानेगाव** : राज्यभरातून मराठा आंदोलकांसाठी भोजन व्यवस्था केली जात आहे. गावागावातून शिदोरी पाठवली जाते. नेवासा तालुक्यातील पानेगाव येथूनही ५००० भाकरी, भाजी पाठवण्यात आली. यावेळी आदीवासी समाजाचा श्रेयश गोविंद लांघे या चौथीत शिकणाऱ्या मुलाने शिदोरी आणली. त्याचबरोबर आपल्या खाऊचे पैसेही दिले. ( छाया : बाळासाहेब नवगिरे )

---


जावक क्रमांक / २८४८/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग,
माणिकलाल लोढा बिल्डींग, स्वस्तिक.चौक, स्टेशन रोड, अहमदनगर,

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन. क्रमांक: AHM/35345/18/24

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांकः सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री. चक्रधर महानुभव मठ, भोकर, मु. पो. भोकर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर बाबत न्यासाचा पत्ता :- भोकर, वडाळा महादेव, श्रीरामपूर, अहमदनगर, श्रीरामपूर, भोकार अर्जदार-विनायक व्यास दत्तराजे, सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय? जंगम मिळकत (वर्णन) अ.क्र.१, तपशील 1-NIRANJAN,1-PANCHARTI, 1AUDBATTI GHAR AND CASH CIN अंदाजे मूल्य-Rs.5000/- (अ) जंगम मिळकतः रोख रु. ५०००/- मात्र (अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त) स्थावर मिळकत (वर्णन) अ.क्र. शहर किंवा गांव -1 BHOKAR, TAH. SHRIRAMPUR, DIST-AHILYANAGAR, सी. एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.- 310/E/2.2, क्षेत्र- 1200.00 Sq Ft/111.48 Sq Mt मूल्यांकन-1.20 मुदत /कालावधी किंवा स्वरूप Vinayak vyas Punjabi, mahanubhaw अंदाजे मूल्य 2000000.00 (ब) स्थावर मिळकतः रोख रु. २००००००/- मात्र (अक्षरी रुपये वीस लाख मात्र फक्त)सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०१-०९-२०२५ रोजी दिली.

शिक्का

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहमदनगर


---

# कोल्हारमध्ये गौराईंची महापूजा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : ज्येष्ठा-कनिष्ठा गौरींचे सोनपावलांनी घरोघरी मोठ्या उत्साहात आगमन झाले आहे. तीन दिवसांच्या माहेरपणाला येणाऱ्या गौराईचे मोठ्या थाटामाटात स्वागत करून गौरींची स्थापना करण्यात आली. त्यांना पूजन करण्यात आले व तसेच त्यांना जेवणासाठी पुरणपोळीचे नैवेद्य दाखवण्यात आला.

गौराईच्या आगमनाची चाहूल लागल्यापासून महिलांची आठ दिवसांपासून लगबग सुरू होवून घराची स्वच्छता, फराळासह सजावटीची जय्यत तयारी करण्यात महिलांची लगबग दिसून आली. जेष्ठा, कनिष्ठा सोनपावलांनी महालक्ष्मी घरी आल्या महालक्ष्मी घरी आल्या, असे म्हणत वाजत गाजत घरातील देवघर, तुळस,



धन धान्याची जागा आदी ठिकाणी मिरवित मनोभावे पूजन करीत गौरींची स्थापना करण्यात आली. यावेळी महिलांनी सुख समृद्धीसह उत्तम आरोग्यासाठी गौराईंना साकडे घातले. गौराईचे तीन दिवस माहेरपण असते यामध्ये रविवारी (ता. ३१) गौराईचे आगमन, सोमवारी (ता.१) ज्येष्ठा-कनिष्ठांचे भोजन आणि महापूजन, महिलांचे हळदी कुंकू व मंगळवारी गौराईचे विसर्जन असे कार्यक्रम असतात.

---

# साकुरी ग्रामपंचायतने महामार्गावर मैला सोडल्याने अपघात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील साकुरी ग्रामपंचायतने महामार्गावर मैलामिश्रित पाणी सोडल्याने अनेक दुचाकीस्वार जखमी झाले हा अतिशय निंदणीय प्रकार असुन लोकांच्या जिवाशी खेळणे बंद करा अशी संतप्त भावना भाजपाचे नेते डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी व्यक्त केली आहे .

साकुरी ग्रामपंचायतीने गटार दुरुस्ती करताना त्यातील मैलामिश्रित पाणी रस्त्यावर सोडल्याने आठ ते दहा दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले असून त्यापैकी काहींना फ्रॅक्चर झाल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी घटनास्थळी भेट दिली. पिपाडांसमोरच दुकाचाकीस्वार घसरुण पडले. काहींना मेंदुला मार लागल्यामुळे त्यांना नगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. सुमारे एक किलोमीटरपर्यंत पसरलेल्या या मैलामिश्रित पाण्यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार खेदजनक आहे, असे मत डॉ. पिपाडा यांनी व्यक्त केले. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून महामार्गावर घाण पाणी सोडणे त्वरित थांबवण्याची सूचना केली. खरेतर, राहाता किंवा शिर्डी नगरपालिकेची जेटिंग मशीन बोलावून हे काम करणे आवश्यक होते, मात्र कोणताही



विचार न करता बेजबाबदारपणे हे पाणी महामार्गावर सोडणे संतापजनक आहे.

या घाण पाण्यामुळे संपूर्ण एक कि.मी. पर्यंतच्या परिसरात मैल्याच्या पाण्यामुळे दुर्गंधी पसरली होती. साकुरी ग्रामपंचायतीच्या या बेजबाबदारपणामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आणि संताप व्यक्त होत आहे. महामार्गावर मैलायुक्त पाणी सोडून नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचे भान साकुरी ग्रामपंचायतीला राहिले नाही, अशी खंत डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी व्यक्त केल आहे .

## पान १ वरुन

### गणपती बाप्पा पावला...!

दुपारी चार वाजता राज्य सरकारच्या वतीने जरांगेंच्या मागण्यांचा अंतिम मसुदा घेऊन उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार गोरे, उदय सामंत हे मंत्री जरांगेंच्या भेटीला पोहचले. याठिकाणी मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्यांवर सरकारकडून काय तोडगा काढण्यात आला त्याचा मसुदा सगळ्यांसमोर वाचून दाखवण्यात आला. या मसुद्यातील मागण्यांचे जीआर निघाल्यानंतर मराठा जल्लोष करेल, गुलाल उधळूनच आम्ही इकडून जाऊ असं सांगत तुमच्या ताकदीवरच आपण जिंकलो अशी घोषणा मराठा आंदोलकांसमोर मनोज जरांगे पाटील यांनी केली.

२९ ऑगस्टपासून मुंबईत मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण सुरू होते. तेव्हापासून राज्य सरकारच्या नेमलेल्या उपसमितीची बैठक वारंवार सुरू होती. या बैठकीला राज्याचे महाधिवक्ता, न्या. शिंदे समितीचे अध्यक्ष आणि मंत्रिमंडळातील इतर सदस्य हजर होते. या बैठकीत मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्यांवर विचार करण्यात आला. यानंतर उपसमितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत उपसमितीने केलेल्या शिफारसीनंतर अंतिम मसुदा तयार करण्यात आला. त्यानंतर हा मसुदा घेऊन स्वत: राधाकृष्ण विखे पाटील जरांगेच्या भेटीला पोहचले होते. तिथे सर्व मागण्यांबाबत सरकारकडून उचललेली पावले लोकांसमोर वाचून दाखवण्यात आली.

### निलंबित पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे यांची आत्महत्या

तेंव्हापासून ते नैराश्यात होते. मुले पुण्याला शिक्षण घेत असल्याने त्यांच्या पत्नी मुलांकडे पुण्याला गेल्याचे बोलले जात आहे. अंबाजोगाई येथे घराचे बांधकाम सुरू असल्याने अंबाजोगाई येथील भाड्याचा घरी सुनिल नागरगोजे हे एकटेच होते. रात्री ८ वाजेच्या सुमारास त्यांनी गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

### श्रीरामपूर शहर व तालुका अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्यकारिणी जाहीर



श्रीरामपूर : येथे नुकतीच अंधश्रद्धा निर्मूलन समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी श्रीरामपूर शहर अध्यक्षपदी सुभाष गायकवाड, उपाध्यक्ष भीमराव कदम, कार्याध्यक्ष मुजीब शेख तर सचिवपदी मोसिन सय्यद यांची नियुक्ती करण्यात आली.

श्रीरामपूर शहर व तालुका अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखेची स्थापना राज्य कार्यकारिणी सदस्य प्रा.प्रवीण देशमुख, अंधश्रद्धा निर्मूलन समिती ट्रस्टचे अध्यक्ष गणेश चिंचोले यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर अनाप यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली.

अध्यक्षपदी.आरोग्य दूत म्हणून सर्व परिचित असलेले सामाजिक कार्यकर्ते सुभाष गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. इतर कार्यकारणी सदस्य पदी.. उपाध्यक्ष- भीमराव कदम, कार्याध्यक्ष- मुजीम शेख, प्रधान सचिव- मोसिन सय्यद, कायदा विभाग- ड.अण्णासाहेब मोहन, युवा व विवेक वहिनी विभाग- अमोल सोनवणे, महिला विभाग - पुष्पा शिंदे, वैज्ञानिक जाणीव प्रकल्प विभाग- संदीप जावळे,सोशल मीडिया विभाग - अमोल नलावडे, वार्तापत्र, प्रकाशन व प्रसिद्धी विभाग- अर्जुन राऊत, प्रशिक्षण विभाग- गणपत शिनगर, विविध उपक्रम- संतोष त्रिभुवन, बुवाबाजी संघर्ष विभाग- सुभाष बोधक, प्रसिद्धी विभाग- अर्जुन राऊत यांची निवड करण्यात आली.

### पोलीस निरीक्षक महेश पाटील यांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव

**नेवासा:** येथील पोलीस स्टेशनचे निरीक्षक महेश पाटील यांनी पदाची सूत्रे हाती घेताच ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांनी खेळाडूंना दिलेल्या पाठबळाबद्दल टोका-प्रवरासंगम येथील जय मल्हार मित्र मंडळ व श्री सिध्देश्वर बहुउद्देशीय सेवा भावी संस्थेच्या वतीने त्यांचा श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या हस्ते पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या बैठकीत सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

## आशियाई रायफल शूटिंग स्पर्धेत

# त्रिमूर्तीच्या वेदांत वाघमारेने तीन सुवर्ण,एक कांस्य पदक पटकावले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** सोळाव्या एशियन रायफल शूटिंग स्पर्धेत मेजर साहेबराव घाडगे पाटील स्थापित त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी वेदांत नितीन वाघमारे याने तीन सुवर्ण व एक कांस्य पदक पटकावत देशाची राज्याची व नेवासा तालुक्याची मान उंचावली आहे. त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती ,कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा तो विद्यार्थी आहे.

या ऐतिहासिक यशानंतर त्रिमूर्ती परिवाराकडून वेदांत चे त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.या कार्यक्रम प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा अँड.सुमतीताई घाडगे ,उपाध्यक्षा स्नेहलताई घाडगे-चव्हाण ,,श्रुती घाडगे-आमले ,विश्वस्त चेतन चव्हाण ,सचिव मनीष घाडगे पाटील,डॉ. अनुराधा गोरे,प्रा.डॉ.चांगदेव आरसुळे, उपप्राचार्य प्रा.निकिता बर्गे,प्रा.संतोष जावळे,प्रा.सोमनाथ खेडकर,प्रा.योगिता गायकवाड,प्रा.अक्षय देवतरसे, प्रा. अनिकेत आरसुळे,प्रा. गोरख गुंड,प्रा.अश्विनी औटी,प्रा. वैष्णवी मिसाळ,प्रा. प्रवीण आवारे,प्रा.राहुल बोरुडे, प्रा.पल्हारे,प्रा.प्रांजल थोरात,प्रा.मंगेश वैरागर तसेच क्रीडा व सैनिकी प्रशिक्षक, इतर पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाचे संस्थापक साहेबराव घाडगे यांनी विद्यार्थ्यांसाठी पाहिलेले ऑलम्पिक पदकाचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होत असल्याचा विश्वास अँड.सुमतीताई घाडगे पाटील यांनी यावेळी बोलतांना केला. वेदांतच्या कामगिरीबद्दल त्रिमूर्ती परिवाराकडून ऑलम्पिक स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## निधन वार्ता..

### एकनाथ ताजणे



**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक, आदर्श शिक्षक व समाजभिमुख व्यक्तिमत्त्व एकनाथ सखाराम ताजणे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, दोन मुली, जावई, भाऊ, पुतणे व नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील पत्रकार वैभव ताजणे व प्रेस फोटोग्राफर सचिन ताजणे यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.

### एक गाव एक गणपतीमुळे गावाचा एकोपा : अपर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे

**खंडाळा :** गेली आठ वर्षापासून गावात एक गाव एक गणपती हा उपक्रम एकोप्याने सुरू असून गावाचे सर्वधर्मिय कार्यक्रम एकत्रित पार पडत असतात हे कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन अपर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले.

श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथील एक गाव एक गणपती उपक्रमास त्यांनी भेट दिली त्यावेळी ते बोलत होते. सन २०१८ पासून पहिले लोकनियुक्त सरपंच अशोक पवार यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु झाला.पहिल्याच वर्षी जिल्हा पोलीस अधिक्षक रंजनकुमार शर्मा यांचे समवेत मी या उपक्रमास भेट दिली होती.

शहराजवळ व एम.आय.डी.सी.च्या क्षेत्राजवळ जमिनीचे विवाद व खंडणीसारखे प्रकार अनुभवायला येतात परंतू येथे तसे नाही.सर्वधर्मिय कार्यक्रम एकत्रित पार पाडले जातात हा एकसंघपणा असाच सुरू ठेवावा.आज या ठिकाणी महिला व मुली पुरुषांपेक्षा जास्त आहेत म्हणजेच कार्यक्रम चांगले चालतात हे स्पष्ट होते.या ठिकाणी शालेय मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, पुरुष,महिला,मुले,मुली यांच्या विविध स्पर्धा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व ग्रामस्थ,उपस्थित भाविक व उत्सव समितीच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेती महामंडळाच्या कामगारांना म्हाडाच्या घरांची प्रतिक्षा

**पुणतांबा :** शेती महामंडळाच्या चांगदेव नगर लक्ष्मीवाडी श्रीरामपूरसह १३ मळ्यावरील सेवानिवृत्त कामगारांना म्हाडाची घरे केंव्हा मिळतील याकडे लक्ष लागून आहे. महामंडळाच्या कामगारांना घरबांधणीसाठी किमान दोन गुंठे जागा मिळावी ही गेल्या अनेक वर्षापासूनची कामगार व कामगार नेत्यांची मागणी होती, मात्र त्याचा शासनाने विचार केला नाही मात्र महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी २५ एप्रिल २०२५ रोजी महामंडळाच्या अंदाजे २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाच्या माध्यमातून योग सद्रिका देण्याची घोषणा केली होती, मात्र अद्यापही त्याच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही सुरू झालेली नाही .

शेती महामंडळाच्या सर्व मळ्यावर २ हजार ९६६ निवासस्थाने आहेत यापैकी १हजार ७८६ निवासस्थाने राहण्यास अयोग्य ठरविण्यात आली आहेत. त्यामुळे ती रिक्त करून म्हाडामार्फत घरे देण्यात येणार असल्याचे विचाराधीन आहे. विशेष म्हणजे चांगदेव नगर मळ्यावर खंडकरी शेतकऱ्यांना जमीनीचे वाटप करून तसेच संयुक्त शेती उपक्रमाल दिलेली जमिन वगळून अद्यापही २५ ६ एकर जमीन शिल्लक आहे तसेच वाडया वस्त्यावर तसेच महामंडळाच्या जमिनीवर झालेली अतिक्रमणे काढले तर जमिनीचे क्षेत्र वाढणार आहे. त्यामुळे म्हाडाची घरे देण्यापेक्षा प्रत्येकांना प्रत्येकी दोन गुंठे जागाचे वाटप केले तर येथील कामगारांचा घरांचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे. सध्या महामंडळाच्या कामगारांची अपेक्षा म्हाडाची घरे मिळणार का ?की दोन गुंठे जागा मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## अपमानास्पद वागणुकीबद्दल आमरण उपोषण करणार

**श्रीरामपूर :** शहर पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक यांनी दिलेल्या अपमानास्पद वागणुकीबद्दल जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाघ घार्गे यांनी तातडीने कारवाई न केल्यास १० सप्टेंबरपासून श्रीरामपूरच्या मेनरोडवरील गांधी पुतळ्यासमोर उपोषण करणार असल्याची नोटीस राजेंद्र मुरलीधर पानसरे यांनी १ सप्टेंबर रोजी जिल्हा पोलिस अधिक्षकांना पाठविली आहे.

पानसरे यांनी अप्पर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांची १ सप्टेंबर रोजी समक्ष भेट घेवून त्यांना निवेदनाची प्रत दिली आहे. शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांनी माझे पत्र न स्वीकारता अपमानास्पद वागणूक देत पुनश्च या कामासाठी पोलिस ठाण्यात यावयाचे नाही, असे म्हणत पत्र अंगावर फेकून दिल्याचे पानसरे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

पोलिस निरीक्षकांनी पत्र स्वीकारून मला योग्य असे उत्तर, खुलासा देणे गरजेचे असतांना पत्र न स्वीकारता माझे कामाची दखल घेतली नाही व अपमानास्पद वागणूक देत पत्र माझे अंगावर फेकून परत येथे यायचे नाही, असा दम दिला आहे, असे निवेदनात नमूद केले आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षकांनी अपमानास्पद वागणुकीची चौकशी करून पोलिस निरीक्षकांवर कारवाई तातडीने न केल्यास कारवाईच्या मागणीसाठी १०सप्टेंबरपासून गांधी पुतळ्यासमोर उपोषण सुरू करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

उपोषण निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे, अप्पर पोलिस अधीक्षक व उपविभागीय पोलिस अधीक्षकांना पाठवून हीच उपोषणाची अंतिम नोटीस समजावी. यापुढील सर्व जबाबदारी पोलिस खात्यावर राहिल.





## गंगापूर तालुक्यातून मुंबईत कर्तव्याची शिदोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** गंगापूर तालुक्यातील टेंभापुरी, तुर्काबाद, गुरुधानोरा, माळवाडी, भगतवाडी, राजुरा, येसगाव, लिंबे जळगाव, कोडापूर आदी गावांसह सर्व समाजबांधवांच्या वतीने मुंबई आझाद मैदान येथे सुरु असलेल्या संघर्षात सहभाग नोंदविणाऱ्या बांधवांसाठी कर्तव्याची शिदोरी रवाना करण्यात आली.

सध्या आझाद मैदानावर मनोज दादा जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या अमर उपोषणाला पाठिंबा म्हणून ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार व सर्व समाजघटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ही शिदोरी मोठ्या उत्साहात रवाना केली.

या उपक्रमात विविध गावांमधील सर्व समाजबांधवांनी सहभाग घेऊन आपली एकजूट व संघर्षासाठीची बांधिलकी अधोरेखित केली. ग्रामीण भागातून गेलेली ही शिदोरी केवळ अन्नधान्याची मदत नसून, समाजातील ऐक्य, बांधिलकी व हक्कासाठीच्या लढ्यातील सहभागाचे प्रतीक आहे.

या प्रसंगी परिसरातील धनगर, मुस्लिम,तेली,ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी संघर्षाला अखंड पाठिंबा दर्शविताना समाज एकतेचा संदेश दिला.

## महात्मा गांधी विद्यालयाचे हॉलीबॉल स्पर्धेत यश





**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभाग आणि राहाता तालुका क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १७ ते १९ वजन गटांमध्ये हॉलीबॉल स्पर्धेत महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

गोगलगाव येथे आयोजित तालुकास्तरीय हॉलीबॉल स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी द्वितीय क्रमांक प्राप्त करून यश संपादन केले. संघनायक अनिरुद्ध जेजुरकर याच्या नेतृत्वाखाली सुयश तांबे, सार्थक जेजुरकर, कृष्णा खुळपे, अजय कापसे, सुशांत दळे, रोहन खरात, आदेश मिरपगार, आयुष तरटे, अल्तमस शेख, रहेमान शेख व अमर भिसे या खेळाडूंनी विशेष परिश्रम घेतले.

या यशस्वी खेळाडूंचे स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रावसाहेब म्हस्के, उपाध्यक्ष अरुण कडू, एकनाथराव घोगरे, माजी प्राचार्य भिमराव आंधळे, प्राचार्य विनायक मेथवडे, मुख्याध्यापिका नलिनी जाधव, उपमुख्याध्यापक दिलीप डहाळे, उपप्राचार्य अलका आहेर, पर्यवेक्षिका संगीता सांगळे, डॉ. शरद दुधाट, संजय डूबे, देवेश आहेर, संजय ठाकरे, नरेंद्र ठाकरे, बाबासाहेब अंत्रे, शिवप्रसाद जंगम आदींसह विद्यार्थी, पालक यांनी अभिनंदन केले आहे.

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि. ०३ सप्टेंबर २०२५**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९ ४८० २०० | २-७ | १२४ ४६७ ११५ | जोड २१-६७-३४-०९-७५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १७० २६० ४४० | ८-० | १९० २८० ००० | जोड ८५-३०-१४-६२-०९ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १३० २४८ ४०० | ४-२ | १५६ ३९० २२८ | जोड ४६-०२-१८-७९-२३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# प्रवरा सांस्कृतिक महोत्सवातून परिसराचा एकोपा कायम : शालीनीताई विखे पा.









प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** आपली एकात्मता कायम ठेवण्याचे काम संस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून होत असते. हीच परंपरा जपण्याचे काम लोणी ग्रामस्थांच्या माध्यमातून होत आहे, मागील २५ वर्षापासून लोणी मध्ये एक गाव एक गणपती हा उपक्रम अनेक गावांसाठी दिशादर्शक आहे .प्रवरा शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून परिसरातील विविध शाळा महाविद्यालयातील नवोदित कलाकारांना प्रवरा सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून मोठे व्यासपीठ मिळत असते यातूनच चांगले कलाकार घडत असतात असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

लोणी येथील श्रीराम मंदिर प्रांगणात लोणी बुद्रुक ग्रामस्थ आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था,लोणी यांच्या वतीने आयोजित प्रवरा सांस्कृतिक महोत्सव २०२५ च्या शुभारंभ प्रसंगी सौ. विखे पाटील बोलत होत्या. यावेळी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष संपतराव विखे ,सेवा संस्थेचे अध्यक्ष अशोकराव धावणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राहुल धावणे, भाऊसाहेब विखे, सोपानराव विखे, एन. डी. विखे, रामभाऊ विखे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे , डॉ.महेश खर्डे, डॉ. आर. ए . पवार, डॉ.मोहसिन तांबोळी. प्रा. अर्जुन आहेर, यांच्यासह विविध शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य आणि महागपती केंद्राचे समन्वयक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना सौ. विखे पाटील म्हणाल्या, संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या संकल्पनेतून दरवर्षी प्रवरा सांस्कृतिक महोत्सव हा उपक्रम सुरू असतो. या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ प्रवरेच्याच नव्हे तर परिसरातील विविध शाळा महाविद्यालयांना कलाक्षेत्रासाठी व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. प्रवरा शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून आणि संस्थेच्या कार्यकारी अधिकारी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील यांच्या माध्यमातून शिक्षणाबरोबरच क्रीडा, भारतीय संस्कृतीचे ज्ञान आणि प्रबोधन, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून होत असते. यातून दर्जेदार विद्यार्थी घटावा हाच प्रयत्न संस्थेचा राहिला आहे. असे सौ. विखे पाटील म्हणाल्या.

डॉ.सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक प्रवरा सांस्कृतिक महोत्सव २०२५ च्या माध्यमातून थिंक ग्लोबली क्ट लोकली ही संकल्पनेच्या माध्यमातून विविध कलागुणांना संधी देत पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचा जीवनपटही विद्यार्थी शिक्षक आणि ग्रामस्थांपर्यंत पोहोचवण्याचा अनोखा प्रयत्न या उपक्रमातून संपन्न होत आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राची लोक संस्कृती, देशाची लोक संस्कृती त्याचबरोबर परिसरामध्ये मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून सुरू असलेले विविध उपक्रम विद्यार्थ्यांनी नाटिका पोवाडे , आणि एकपात्री प्रयोगाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर सादर केले.

या निमित्ताने विविध कला कौशल्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक गटांतील महाविद्यालयातील गुणवंत कलाकारांचा गौरवही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला परिक्षक म्हणून सिने अभिनेते दिनेश भाने,रिले स्टार गंगाराम धनवटे यांनी काम पाहीले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शांताराम चौधरी यांनी केले.

**लोणी येथील प्राथमिक उर्दू शाळेतील मुलांनी सादर केलेले देशभक्तीपर गीत आणि लोणी परिसरातील प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या विविध कला अविष्कारला प्रेक्षकांनी भरभरून असा प्रतिसाद दिला. याशिवाय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यासह उच्च शिक्षण घेत असलेल्या मुलां-मुलींनी श्री गणेश वंदना, मंगळागौर,पोवाडा,मोबाईल चा अतिवापर आणि त्यांचे परिणाम, पाणी बचततीवर भारुड, लोक परंपरा यांचा संगम साधत तीन तासांच्या सांस्कृतिक कार्यक्रमातून मनोरंजनातून प्रबोधन केले.**

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |
| 23/06/2025 to 28/06/2025 | 159 53 247 | 125 81 236 | 279 81 137 | 248 48 800 | 256 31 344 | 349 64 590 |
| 30/06/2025 to 05/07/2025 | 145 06 349 | 470 14 699 | 334 02 660 | 470 15 780 | 369 89 126 | 223 75 267 |
| 07/07/2025 to 12/07/2025 | 189 81 380 | 233 88 224 | 378 88 189 | 699 41 335 | 248 48 125 | 458 77 467 |
| 14/07/2025 to 19/07/2025 | 789 44 248 | 116 85 140 | 138 28 189 | 359 72 138 | 689 36 268 | 678 13 346 |
| 21/07/2025 to 26/07/2025 | 790 68 350 | 678 10 299 | 389 05 456 | 377 71 669 | 378 82 345 | 150 61 678 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द • ख • ल

## माळीवाडा परिसरात तलवारीसह इसम ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील माळीवाडा येथील साठे वसाहत परिसरात तलवार आणि कोयते घेऊन दहशत माजवणाऱ्या इसमाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ कारवाई करून ताब्यात घेतले. सचिन अनिल गायकवाड (वय ३५, रा. हरिजन वस्ती, साठे वसाहत, माळीवाडा) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून तलवार आणि तीन लोखंडी कोयते जप्त करण्यात आले आहेत.या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अमोल दिलीप गाडे (वय ३८) यांनी फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ३१ ऑगस्ट रोजी दुपारी तीनच्या सुमारास पोलीस उपनिरीक्षक गणेश बाळासाहेब देशमुख यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सचिन गायकवाड तलवार घेऊन साठे वसाहतीत रस्त्यावर आरडाओरड करत दहशत निर्माण करीत आहे.त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोहेकॉ. विनोद बोरगे, पो.कॉ. विक्रम वाघमारे, सूर्यकांत डाके, अतुल काजळे, महेश पवार यांनी तत्काळ धाव घेऊन परिसरात सापळा रचला. यावेळी आरोपीला ताब्यात घेत त्याच्याकडून तलवार व तीन लोखंडी कोयते हस्तगत करण्यात आले.सदर शस्त्रांचा पंचनामा करून पोलिसांनी जप्ती केली असून, आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा करत आहे.

## दारूसाठी पैसे न दिल्याने एकाला लोखंडी रॉडने मारहाण; चार आरोपींविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील गांधी मैदान परिसरात सार्वजनिक स्वच्छतागृहाजवळ दारूसाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून एका व्यक्तीवर चार जणांनी एकत्रित हल्ला केला. यात लोखंडी रॉडने डोक्यावर वार झाल्याने गौरव ईश्वर सारसर (वय ४०, रा. नगर) गंभीर जखमी झाले. ही घटना ३१ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडली. गौरव सारसर हे मित्र संजय सावरे यांच्यासह गांधी मैदान परिसरात बसले असताना लघवीसाठी गेले होते. यावेळी स्वच्छतागृहाजवळ ऋषीकेश विजय मोरे, सनी शिंदे, अक्षय शर्मा आणि प्रमोक्ष पंजाबी हे दारूच्या नशेत थांबले होते. त्यांनी गौरव यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. मात्र, पैसे नसल्याचे सांगताच चौघांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.दरम्यान, ऋषीकेश मोरे याने लोखंडी रॉडने गौरव यांच्या डोक्यावर वार केला. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर कोतवाली पोलिसांनी वरील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल, भावाला मारहाण जितेंद्र परळकरविरुद्ध कोतवालीत गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील आदर्श नगर परिसरात अल्पवयीन मुलीला मोबाईलवरून घरी बोलावून तिच्यासह भावाला मारहाण केल्याची तसेच कुटुंबीयांना जातीवाचक शिवीगाळ करून मानसिक छळ केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी जितेंद्र अनिल परळकर याच्याविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेविषयी मिळालेली माहिती अशी की, ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री सुमारे अकराच्या सुमारास परळकर याने अल्पवयीन मुलीला फोन करून घरी बोलावले. न आल्यास तिचे आणि त्याचे एकत्रित फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याने घाबरलेल्या मुलीने त्याच्या घरी जाणे भाग पडले. यावेळी तिचा भाऊ देखील तेथे पोहोचला असता त्यांच्यात वाद झाला. वादाच्या दरम्यान जितेंद्र परळकर याने मुलीच्या भावाला मारहाण केली. याचवेळी अपमानास्पद व जातीवाचक शब्दांचा वापर करून पीडित कुटुंबाचा मानसिक छळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी मुलीच्या कुटुंबीयांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी परळकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## हद्दपार आरोपी विजय भनगाडे ताब्यात कोतवाली पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातून हद्दपार करण्यात आलेला विजय गजानन भनगाडे (वय ३२, रा. भवरी चाळ, संभाजी कॉलनी) हा परवानगीशिवाय पुन्हा शहरात परतल्याने कोतवाली पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनी ही कारवाई केली.३१ ऑगस्ट रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत भनगाडे शहरात परतल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार कोतवाली पोलिसांच्या पथकाने भवरी चाळ परिसरात छापा टाकत त्याला पकडले.भनगाडे याला १८ मार्च २०२४ रोजी दोन वर्षांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. मात्र, परवानगी न घेता तो पुन्हा आपल्या राहत्या घरी परतल्याने त्याने आदेशाचा भंग केला. याबाबत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ह्या कारवाईत पोलीस कॉन्स्टेबल सचिन राजेंद्र लोळगे, पोहेकॉ विनोद बोरगे, पो.कॉ. शिरीष तरटे, पो.कॉ. हरिदास कोतकर आणि पो.कॉ. सोमनाथ केकाण यांच्या पथकाचा सहभाग होता.

# सुवर्णयुग प्रश्नमंजुषा उपक्रम स्तुत्य : प्रशांत भालेराव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** यूपीएससी,एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांचे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून जगणाऱ्या तरुणाईसाठी सामान्य ज्ञानाचा पाया भक्कम असणे अत्यंत आवश्यक आहे.विद्यार्थीदशेतच वाचनाची आवड निर्माण होऊन गुणवत्तेत भर पडावी या उद्देशाने सुवर्णयुग प्रश्नमंजुषा उपक्रम राबविण्यात आला असून, हा उपक्रम पुढील पिढीला शासनातील विविध पदांवर पोहोचण्यासाठी मार्गदर्शक ठरेल असे प्रतिपादन रेणुका माता मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन प्रशांत भालेराव यांनी केले. शहरातील शेवाळे गल्ली येथील सुवर्णयोग तरुण मंडळाच्या वतीने प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.त्या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भालेराव बोलत होते.याप्रसंगी चैतन्य अर्बन बँकेचे चेअरमन अनंत ढोले, महाराष्ट्र बँकेचे शाखा अधिकारी दिनेश सांभरिया,सहदेव दादा



शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महेंद्र शिरसाट,गोपालसिंग शेखावत,वैभव शेवाळे,राजेंद्र शेवाळे,संजय उदमले तर पारितोषिक वितरणासाठी गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड,विश्वविनायक मल्टीस्टेटचे चेअरमन मोदक शहाणे, आदी उपस्थित होते. यंदाची प्रश्नमंजुषा स्पर्धा ही चुरशीची होऊन यामध्ये प्रथम क्रमांक श्री तिलोक जैन विद्यालयाने पटकावला आहे.तर द्वितीय क्रमांक श्री स्वामी समर्थ विद्या मंदिर व श्री.विवेकानंद विद्या मंदिर या विद्यालयांना विभागून देण्यात आला आहे. तर तृतीय पारितोषिक हे संत ज्ञानेश्वर विद्यालयाला मिळाले आहे.या प्रश्नमंजुषा परीक्षेमध्ये शहरातील एकूण चार विद्यालयातील संघांनी सहभाग नोंदवला होता.एका विद्यालयाचे दोन विद्यार्थी असे एकूण आठ विद्यार्थी यात सहभागी झाले होते. स्पर्धेच्या चार प्रश्नांच्या फेऱ्या घेण्यात आल्या.यंदाचे सुवर्णयुग आंतरविद्यालयीन प्रश्नमंजुषाचे हे पंधरावे वर्ष होते. या स्पर्धेसाठी शाहरुख शेख, मोनीश उदबत्ते, सोनल जोजारे, राहुल भगत, कुणाल महानवार, ओम डागा, मुकुंद लोहिया, मुकुंद सुराणा,अँड. प्रतीक वेलदे, उमेश रासने, दत्ता पंडित,शैलेंद्र दहिफळे, मोहन यादव आदींनी परिश्रम घेतले.प्रास्ताविक तथा विद्यार्थ्यांबरोबर प्रश्न उत्तरासाठी संवाद साधत वैभव शेवाळे यांनी स्पर्धा घेतली.सूत्रसंचालन अभय गांधी यांनी करून आभार अमोल कांकरिया यांनी मानले.

## जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत पै. विराज बोडखेचे सुवर्णयश पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महापालिका क्रीडा विभागाच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पै. विराज बाबासाहेब बोडखे याने झुंजार खेळाची छाप पाडत १७ वर्षाखालील गटात सुवर्णपदक पटकाविले. या यशामुळे त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. भिस्तबाग, पवननगर येथील छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्रात झालेल्या या स्पर्धेत महापालिका हद्दीतील विविध शाळांमधील तब्बल ११५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या प्रतिस्पर्ध्यांमध्ये पै. विराज बोडखे याने चितपट कुस्ती करीत प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारली. त्याच्या या दमदार कामगिरीमुळे विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी त्याची निवड झाली असून, पुणे, सोलापूर व नगर जिल्ह्यांच्या विजेत्यांमध्ये आता चुरशीचे सामने रंगणार आहेत. येथून विजयी होणाऱ्या खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत चमक दाखविण्याची संधी मिळणार आहे. पै. विराज हा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक व शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांचा लहान मुलगा आहे. तो भिस्तबाग येथील छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्रात पै. शिवाजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वस्ताद पै. संदीप गायकवाड, पै. नितीन आव्हाड, पै. आतीष ठाकूर व पै. शंभू यादव यांच्याकडून कुस्तीचे धडे घेत आहे. तो सध्या सावेडी येथील आनंद विद्यालयात इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत आहे. या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप, गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप, आनंद विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## उपक्रमशील शिक्षक सुनिल कटारिया यांचा सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहरातील श्री तिलोक जैन विद्यालयातील उपक्रमशील विज्ञान शिक्षक सुनिल कटारिया यांना अहिल्यानगर जिल्हा विज्ञान संघटनेमार्फत त्यांनी आजपर्यंत केलेल्या विज्ञान विषयातील उत्कृष्ट कार्याबद्दल विशेष दखल घेवून सन्मानीत करण्यात आले. अहिल्यानगर येथे जिल्हा विज्ञान गुणवंत विद्यार्थी पारीतोषिक वितरण,कृतीशिल विज्ञान शिक्षक व उत्कृष्ट विज्ञान संघटक पुरस्कार वितरण समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी उपशिक्षणधिकारी माध्यमिक संजय सरवदे,शास्त्रज्ञ व्ही.



आर.डी.ई रोहित मोरे,गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते,अध्यक्ष पुणे विज्ञान अध्यापक रोहिदास एकाड, डॉ.सुर्यकांत वडकर,बद्रिनाथ शिंदे,धनंजय भांगरे, बळीराम गरड,मदन वडवकर यासह संघटनेतील पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.सुनिल कटारिया हे गत दहा वर्षापासून जिल्हा विज्ञान अध्यापक संघाचे सदस्य असून पाथर्डी तालुका विज्ञानअध्यक्ष व तालुका परीक्षा प्रमुख या पदावर कार्यरत आहेत.या कार्यकाळात त्यांनी ग्रामीण भागातील प्रत्येक शाळेपर्यंत पोहचून विज्ञान स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञान प्रवाहात आणण्याचे सातत्याने कार्य केलेले आहे.या बरोबरच सेवा कालावधीत विज्ञान क्षेत्रासाठी दिलेले योगदान,इन्स्पायर अवॉर्ड,राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, राज्य विज्ञान प्रदर्शन,अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावे,अपूर्व मेळावे,विज्ञान नाट्य महोत्सव,भारतीय मानक ब्युरो अंतर्गत स्टँडर्ड क्लब मधील विविध जनजागृतीपर उपक्रम,विविध राज्यस्तरीय प्रशिक्षणात बजावलेली तज्ञ मार्गदर्शकाची भूमिका,राज्य व राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षणे,विविध सामाजिक संघटनेतील योगदान या सह शैक्षणिक क्षेत्रातील यापूर्वी मिळालेले विविध पुरस्कार या सर्व बाबींचा विचार करून संघटनेतर्फे त्यांना विशेष सन्मानपत्र देवून सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष चंपालाल गांधी,सचिव सतिश गुगळे,खजिनदार सुरेश कुचेरिया,विश्वस्त धरमचंद गुगळे, डॉ.ललित गुगळे,राजेंद्र मुथ्था,विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी,उपप्राचार्य अशोक गर्जे,पर्यवेक्षक मनिषा मिसाळ, भारत गाडेकर,सुधाकर सातपुते,श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे कार्यकारी व सल्लागार मंडळाचे सर्व सदस्य यांनी विशेष अभिनंदन केले.यासह शिक्षण क्षेत्रातून त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे.

## सकल मराठा समाजाच्या वतीने जेजुरीच्या खंडोबाला साकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे आणि आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांचे आरोग्य उत्तम राहावे, यासाठी अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या श्री खंडोबा देवाच्या चरणी सोमवारी (दि. १) रोजी सकल मराठा समाजाने साकडे घातले. सकल मराठा समाजाच्या वतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून रॅली काढण्यात आली. ही रॅली जेजुरी गडावर जात, खंडोबा मंदिरात अभिषेक घालून मनोज जरांगे यांच्या मागण्या तातडीने मान्य व्हाव्यात, अशी प्रार्थना करण्यात



आली. या वेळी गडावर भंडाऱ्याची मुक्त उधळण करत आरक्षण चळवळीला शुभेच्छा देण्यात आल्या. जेजुरी पंचक्रोशीतील मराठा समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत, आंदोलनाला एकजुटीने पाठिंबा दर्शविला. तसेच मुंबईतील आंदोलन स्थळी कार्यकर्त्यांना जेवण व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# सुधामती कवाद या कार्यक्षम समाजकारणी : आ. काशिनाथ दाते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज:** राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या जिल्हा कार्याध्यक्षा तथा निघोज गावच्या कार्यक्षम ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद या कार्यक्षम समाजकारणी असून सामाजिक काम व राजकारण यांचा उत्तम समन्वय साधून त्यांनी समाजकारण हे लोकांकरीता करीत असल्याने त्यांना राज्यस्तरीय ग्रामपंचायत सदस्या पुरस्कार मिळाला असल्याचे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले आहे. पारनेर येथील संपर्क कार्यालयात त्यांचा राष्ट्रवादी पक्ष व तालुक्याच्या वतीने त्यांचा आमदार दाते व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, माजी नगराध्यक्ष विजय औटी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, युवा तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, तालुका उपाध्यक्ष शिवराज कदम,



राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, अर्पणा खामकर, नितीन घोलप, नितीन म्हस्के, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, युवा नेते रमेशशेठ वरखडे, प्रणव भालेराव, सुभाष औटी, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, अल्पसंख्याक समाजाचे युवा नेते अजित सोनवणे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार दाते म्हणाले ,निघोज गावच्या ग्रामपंचायत सदस्या म्हणून त्यांनी गाव व परिसरातील सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी गेली दहा वर्षात मोठ्या प्रमाणात योगदान दिले म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत सदस्या पुरस्कार मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा म्हणून काम करताना त्यांनी एक उत्तम वक्तृत्व व संघटक म्हणून काम करताना तालुक्यातील शेकडो महिलांना पक्षाचा कार्यक्रम सांगत पक्षाशी जोडण्याचे काम केले असून राजकारणात त्यांना उज्वल भविष्य असल्याचे गौरवोद्गार आमदार दाते सर यांनी व्यक्त केले. तालुक्यातील विविध गणेश मंडळे, विवीध संस्था,माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा,पतसंस्था, ग्रामस्थ यांच्या वतीने त्यांचा गेली आठ दिवसांत मोठ्या प्रमाणात सत्कार समारंभ सुरु आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुकाध्यक्ष सुषमा रावडे यांनी केले शेवटी अपर्णा खामकर यांनी आभार मानले.

# मनोज जरांगे पाटलांच्या केसाला धक्का लागला तर महाराष्ट्र पेटेल; सावेडीकरांची गर्जना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील सध्या मुंबईत उपोषणाच्या रणांगणात उभे आहेत. त्यांच्या लढ्याला राज्यभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत असतानाच नगर शहरातील सावेडीकरांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. जरांगे पाटलांच्या केसाला धक्का लागला, तर महाराष्ट्र पेटेल, अशी गर्जना सावेडीकरांनी केली असून, आंदोलनाला अभूतपूर्व पाठबळ दिले आहे.मुंबईतील आंदोलनस्थळी गेल्या चार दिवसांत (दि. २९ ऑगस्टपासून) लाखो मराठा समाजबांधव दाखल झाले आहेत. आंदोलनस्थळ परिसरातील हॉटेल व खाऊगल्ल्या बंद झाल्याने आंदोलक उपाशीपोटी बसले आहेत, अशी माहिती समजताच सावेडीतील ग्रामस्थ, युवक आणि महिला सरसावल्या. आंदोलनकर्त्यांसाठी अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचा सर्वात मोठा ताफा सावेडीतून मुंबईकडे रवाना करण्यात आला. इतिहासातील विक्रमी मदत या ताफ्यात २५ हजार पाण्याच्या बाटल्या, एक टन फरसाण, दहा हजार पॅकेट बिस्किटे, राजगिऱ्याचे लाडू, कोलगेट, साबण, तेलाच्या बाटल्या, ब्रश, तीन हजार धपाटे, तसेच भाकरी, ठेचा, पिठलं यांचा समावेश आहे. ट्रक आणि टेम्पो भरून हा ऐतिहासिक ताफा मुंबईकडे रवाना झाला. आंदोलनाच्या इतिहासातली ही सर्वात मोठी मदत ठरली आहे. ग्रामस्थांनी यावेळी निर्धार व्यक्त केला की, आंदोलनकर्त्यांना जेवण-पाणी आम्ही देऊ, पण आंदोलन दडपण्याचा




प्रयत्न झाला, तर पेट घेणारी ठिणगी सावेडीतून उठेल, असा थेट इशारा त्यांनी दिला. म्हणजेच अन्नासोबत सावेडीकरांची चेतावणीही आता मुंबईच्या दिशेने निघाली आहे.नगर जिल्ह्यातून उस्फूर्त प्रतिसाद सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी मदतीचे आवाहन केल्यानंतर नगर शहरासह नेवासे, शीरामपूर, पारनेर, राहुरी, श्रीगोंदे आदी तालुक्यांतून मोठ्या प्रमाणात अन्नसाहित्य मुंबईकडे पाठवण्यात येत आहे. समाजमाध्यमांतून दिलेल्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, गावोगावी युवक व महिला हळदीकुंकू, कार्यक्रम, मंडळांच्या माध्यमातून मदत जमा करत आहेत. कोपर्डीतून आंदोलनाची ठिणगी अहिल्यानगर जिल्ह्याचा मराठा आंदोलनाशी विशेष नाळ जुळलेली आहे. कोपर्डीतील घटनेनंतर जिल्ह्यातूनच मराठा क्रांती मोर्चांचा बिगुल वाजला आणि संपूर्ण महाराष्ट्र पेटला. त्याच जिल्ह्यातील जरांगे पाटील यांनी आंतरवली सराटीतून आरक्षणासाठी लढा सुरू केला. पहिल्या टप्प्यात या लढ्याला जबरदस्त प्रतिसाद मिळाल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात राज्यभरातील समाजबांधव रस्त्यावर उतरले आहेत. सरकारसमोर निर्णायक क्षण सध्या मुंबईत लाखो आंदोलक बसले असले तरी जे थेट उपस्थित राहू शकत नाहीत ते मदत पोहोचवून आंदोलनात सहभागी होत आहेत. त्यामुळे हा लढा आता जनआंदोलनात परिवर्तित झाला आहे. पुढचा क्षण महाराष्ट्रासाठी किती निर्णायक ठरेल, हे सरकारच्या भूमिकेवर अवलंबून आहे, असे नागरिकांचे मत आहे.

# विघ्नहर्ता सहकारी पतसंस्था लवकरच ५० कोटी रुपये ठेवींचा टप्पा गाठणार : सुभाष साठे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** विघ्नहर्ता नागरी सहकारी पतसंस्था लवकरच ५० कोटी रुपये ठेवींचा टप्पा पूर्ण करणार असल्याचा विश्वास संस्थेचे संस्थापक , चेअरमन सुभाषराव साठे यांनी संस्थेच्या ५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना व्यक्त केला.अल्पवधित पुणे व नगर जिह्यामधे सहकार क्षेत्रात नावारूपाला आलेली तसेच,सभासद , खातेदार , ठेवीदार , कर्जदार यांच्या विश्वासास कायम पात्र राहून काम करत असलेल्या विघ्नहर्ता सहकारी पतसंस्थेची ५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शिरूर येथील संस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या सभागृहामधे खेळी मेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे संस्थापक , चेअरमन सुभाष साठे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली . या सर्वसाधारण सभेत संस्थेच्या सभासदांच्या मुलांचा य शैक्षणिक क्षेत्रात मिळविलेल्या यशाबद्दल तसेंच विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला . यावेळी बोलताना चेअरमन सुभाष साठे म्हणाले , माझ्या मनात पतसंस्था स्थापन करण्याचा कुठलाही विचार कधी नव्हताच, पण समाजासाठी काही



छाया : दत्ता गाडगे विघ्नहर्ता पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत शिरूर येथील मुख्य कार्यालयात सभासदांना मार्गदर्शन करताना संस्थापक, चेअरमन सुभाष साठे व उपस्थित सभासद बांधव.

तरी चांगले करून दाखवायचे होते , म्हणून आपण ही संस्था स्थापन केली . संस्थेचे काम पारदर्शक व्हावे म्हणून आपण सर्व संचालक मंडळाला सोबत घेऊन रात्र रात्र जागून विचार केला आणि योग्य निर्णय घेतला . कोणताही खर्च करताना वर्षभर तरतूद करतो . ज्या कर्मचाऱ्यांनी स्थापने पासून काम केले त्यांच्या पगार वाढीचा विचार केला करत आहोत. त्यांचे आयुष्य म्हणजे संस्था आहे . कोणी ही मनापासून काम केले की , त्याचा विचार केला जातो.आगामी वर्षात सभासदांना लाभांश देण्याचा विचार आहे. आज आलेले लोकं माझ्या व संस्थेच्या प्रेमापोटी आले आहेत . संस्थेचे सभासद खूप हुशार असल्याने माझ्याकडून चुकीचे काम होणार नाही.मी कोणालाही कधी ही दुखावले नाही . आज अखेर संस्थेकडे ३५ कोटी रुपयांच्या आसपास ठेवी असून लवकरच सभासद , खातेदार व ठेवीदार यांच्या विश्वासाला कायम पात्र राहुन आपण काम केल्यामुळे ५० कोटी रुपयांचा ठेवींचा टप्पा आपण गाठत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.संस्थेला लेखापरीक्षण अहवाल सातत्याने अ वर्ग मिळत आहे . संस्थेचे मुख्य कार्यालय शिरूर असून शिरूर तालुक्यातील शिक्रापूर व टाकळी हाजी येथे २ शाखा , तर पारनेर तालुक्यातील निघोज व जवळा येथे २ शाखा अत्यंत सक्षमपणे आणि प्रभाविपणे काम करत आहेत.संस्थेकडे २ कोटी ५० लाख रुपयांचे अधिकृत भांडवल उपलब्ध असून २४ कोटी रुपयांचे कर्ज समाजात पत असणाऱ्या कर्जदार सभासदांना च वाटप केले आहे.संस्थेने आज अखेर ५७ कोटी रुपयांचा संमिश्र व्यवसाय केला आहे . यावेळी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना संचालक मंडळाने अभ्यास पूर्ण उत्तरे दिल्याने ही ५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली .कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संतोष कळसकर व व्यवस्थापक बबनराव बेलोटे यांनी केले. तर आभार प्रशासन प्रमुख रोहन साठे यांनी मानले.या सभेला व्हाईस चेअरमन अजित मदगे,संचालक अशोक कारखिले,गजाबा क-हे, दादाभाऊ गायकवाड,भाऊसाहेब गाडेकर , सुशांत साठे , निर्मला गाडीलकर , वैशाली लाळगे, रविंद्र कर्डीले , सलीम हवालदार, साहेबराव हिंगे , विजय घुले आदिसह सभासद बहू सखेने हजर होते.

# सिताबाई थिटे डी. फार्मसी महाविद्यालयास उत्कृष्ट दर्जा प्राप्त



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरूर:** येथील श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ डी. फार्मसी, शिरूर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई द्वारे करण्यात आलेल्या बाह्य संस्था सर्वेक्षण मध्ये उत्कृष्ट दर्जा प्रदान करण्यात आला अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शहा यांनी दिली. मंडळामार्फत नेमणूक केलेल्या देखरेख समितीच्या पथकाद्वारे सदर सर्वेक्षण करण्यात येते. देखरेख समितीच्या पथकाने महाविद्यालयास भेट दिली. त्या वेळी शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज, आधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालय, सर्व पायाभूत सुविधा, संगणक कक्ष, महाविद्यालयाचा निकाल, अनुभवी शिक्षक वृंद , विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी घेतलेले उपक्रम, मुलींच्या वसतिगृहातील दर्जेदार सोयी सुविधा आणि निकालातील सातत्यपूर्ण प्रगती या गोष्टींचा आढावा घेण्यात आला. या सर्व क्षेत्रात महाविद्यालयाने साधलेली भरीव प्रगती व गुणवत्ता पाहून सिताबाई थिटे कॉलेज ऑफ डी . फार्मसी या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ साठी उत्कृष्ट दर्जा प्रदान केला आहे.महाविद्यालयात रुग्ण समुपदेशन, पालक सभा, औद्योगिक भेट, शैक्षणिक सहली, ग्रीन कॅम्पस आणि नोकरी साठीचे नामांकित कंपन्यांचे मेळावे अशा अनेक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे, संशोधन व नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबविणे हेच आमचे भावी ध्येय आहे असे कॉलेजचे प्राचार्य डॉ.अमोल शहा यांनी नमूद केले. या यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रजी थिटे, सचिव धनंजयजी थिटे, संचालक डॉ हर्षवर्धन थिटे, सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे आजी व माजी विद्यार्थी तसेच पालक वर्ग यांचे मोठे योगदान असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अमोल शहा यांनी सांगितले.

## द • ख • ल

## शिक्रापुरात घरातून महिलेचे मंगळसूत्र लांबवले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे:** शिरूर तालुक्यातील शिक्रापूर येथील मलठण फाटा परिसरातील रंगनाथ भोर हे त्यांच्या पत्नी सुप्रियासह नातेवाईकांकडे जाऊन आल्यानंतर २१ ऑगस्ट रोजी सुप्रिया यांनी त्यांच्या गळ्यातील तीन तोळे वजनाचे मंगळसूत्र कपाटात ठेवले होते, त्यांनतर १ सप्टेंबर रोजी पुन्हा गावी जायचे असल्याने ते कपाटामधून मंगळसूत्र काढत असताना कपाटात मंगळसूत्र नसल्याचे दिसून आले, दरम्यान सर्वत्र पाहणी केली असता मंगळसूत्र कोठेही मिळून आले नाही, त्यामुळे रंगनाथ हे नाईट शिप मध्ये कामाला गेल्यानंतर दरवाजा आतून उघडा असताना कोणीतरी कपाटातील मंगळसूत्र लांबवल्याचा अंदाज रंगनाथ यांनी वर्तवला, याबाबत रंगनाथ म्हातारबा भोर (वय ३२ वर्षे सध्या रा. मलठण फाटा शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. कवठे येमाई ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास हवालदार बापू हाडगळे हे करत आहे.

## पाबळमध्ये एकाची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे:** शिरूर तालुक्यातील पाबळ येथील पांडुरंग पानसरे हे शेतात गेलेले असताना काही वेळाने विश्वास पानसरे हा युवक शेतात गेला असताना त्याला पांडुरंग पानसरे यांनी शेतातील झाडाला गळफास घेतल्याचे दिसून आले .विश्वास यांनी नागरिकांच्या मदतीने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, सदर घटनेत पांडुरंग बबन पानसरे (वय ५८ वर्षे रा. पाबळ ता. शिरुर जि. पुणे) यांचा मृत्यू झाला असून याबाबत सोपान बबन पानसरे (वय ५१ वर्षे सध्या रा. मैत्री पार्क सोसायटी शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. पाबळ ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार संतोष शेळके हे करत आहे.

## उद्या भीमाशंकर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी:** आंबेगाव तालुक्यातील दत्तात्रयनगर, पारगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याची सन २०२४-२५ आर्थिक वर्षाची २९ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ठिक २.०० वाजता कारखान्याचे संस्थापक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री आ.दिलीपराव वळसे पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत व कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील यांनी दिली. वार्षिक सभेमध्ये मागील सभेचा कामकाज वृत्तांत वाचून कायम करणे, संस्थेच्या सन २०२४-२५ वर्षासाठीचा कामकाज अहवाल, नफा तोटापत्रक व दि. ३१.०३.२०२५ रोजीचा ताळेबंद स्वीकारणे व मंजूर करणे, सन २०२४-२५ आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे व सन २०२३-२४ वर्षाचा लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवाल स्विकारणे, सन २०२५-२६ वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणुक व शुल्क ठरविणे, सन २०२५-२६ वर्षासाठी संचालक मंडळाने सादर केलेल्या भांडवली व महसुली अंदाजपत्रकाची, सन २०२४-२५ वर्षात अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या जमाखर्चास मान्यता देणे, भाग विकास निधी रक्कमेच्या विनियोगास मान्यता देणे, भाग विकास निधी व भीमाशंकर शिक्षण संस्था निधी कपातीस मान्यता देणे, स्क्रॅप मटेरियल विक्रीस मान्यता देणे, स्थापत्य भांडवली कामाच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणे इत्यादी विषयी चर्चा होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे असे आवाहन चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी केले.

## मुंबईतील मराठा आंदोलकांसाठी पोंदेवाडीतुन शिधा रवाना

**लोणी धामणी** आंबेगाव तालुक्यातील पोंदेवाडी येथील ग्रामस्थांनी



मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलन सुरू केल्यानंतर आंदोलनकर्त्यांची जेवणाची, नाश्ताची गैरसोय होऊ नये म्हणून तसेच जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी भाकरी चटणी, खाद्यपदार्थ, पाणी पाण्याचे २०० बॉक्स यांसह अन्य खाद्यपदार्थ घेऊन पोंदेवाडी येथुन एक ट्रक मुंबईकडे रवाना झाला आहे . गावातील युवकांनी माजी सरपंच अनिल वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली सोशल मिडियावर मुंबईतील आंदोलकांसाठी पिण्याचे पाणी आणि खाद्य पाठवायचे असा मेसेज केला आणि एका दिवसात एक खाद्यपदार्थ रवाना केले. पुन्हा गरज पडल्यास मदत पाठवणार असल्याचे माजी उपसरपंच संदीप पोखरकर, महेंद्र पोखरकर, अमोल वाळुंज, अशोक वाळुंज यांनी सांगितले.

## भाजप वैद्यकीय आघाडी पुणे जिल्हाध्यक्षपदी डॉ. सुमित काकडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेले डॉ. सुमित काकडे यांची भारतीय जनता पक्षाच्या वैद्यकीय आघाडी पुणे ग्रामीण दक्षिण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शेखर वढणे यांनी दिली. डॉ.सुमित काकडे हे आनंदी लाईफलाईन हॉस्पिटल व आनंदी को-ऑप हॉस्पिटलचे संचालक असून, ग्रामीण संस्था व इतर सामाजिक संस्थांचेही ते प्रमुख आहेत. कोरोना काळात त्यांनी वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान दिले होते. सध्या ते पुरंदर मेडिकल असोसिएशनचे सचिव तसेच रोटरी क्लब ऑफ पुरंदरचे संचालक म्हणूनही काम पाहत आहेत.आरोग्य शिबिरे, मोफत तपासण्या, रक्तदान शिबिरे, गरजूंसाठी मदत मोहिमा अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजाशी सातत्याने नाळ जुळवून ठेवली आहे.माजी आमदार संजय जगताप यांनी नव्याने नियुक्त झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना डॉ. काकडे यांच्या कार्याची प्रशंसा केली. डॉ.काकडे यांच्याकडून भाजप वैद्यकीय आघाडीच्या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्य सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देणे, शेतकरी व कामगार वर्गासाठी आरोग्य जनजागृती मोहीमा राबवणे, तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यविषयक मार्गदर्शन करणे, तसेच पक्षसंघटना व वैद्यकीय क्षेत्रासाठी प्रभावी कार्य होईल असा विश्वास व्यक्त होत आहे.

# जातेगावमध्ये वृक्षवाटप व गावात सीसीटीव्ही बसवत गणेशोत्सव साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**तळेगाव ढमढेरे:** शिरूर तालुक्यातील जातेगाव खुर्द येथे शंभूराजे प्रतिष्ठान आयोजित गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबवत गावामध्ये दोनशे देशी वृक्षांचे वाटप करत गावामध्ये सीसीटीव्ही बसवत गणेशोत्सव साजरा करण्यात आला आहे.शंभूराजे प्रतिष्ठान आयोजित गणेशोत्सवामध्ये पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या आवाहनानुसार परिसरातील नागरिकांसाठी दोनशे देशी झाडांचे वाटप करण्यात आले असून गणेशोत्सवातील अवाढव्य खर्च टाळून राहिलेल्या वर्गणीतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा संकल्प करण्यात आला, यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष संजय तांबे यांच्या विशेष सहकार्यातून झाडांचे वाटप करण्यात आले, तर याप्रसंगी माजी उपसरपंच व शंभूराजे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विकास मासळकर, सरपंच पूनम काशिद, उपसरपंच अतिश निकाळजे, माजी उपसरपंच महेश मासळकर, समीर खंडाळे, गुलाब रणपिसे. चेअरमन गणेश मासळकर, विजय खैरे, दादा चव्हाण, प्रदीप खंडाळे, भूषण घोलप, प्रशांत मासळकर, राम नवगिरे, सोम शिंदे, मोहन घोलप, तन्मय मासळकर, जकिर मुलानी, वेदांत मासळकर यांसह आदी उपस्थित होते. याबाबत बोलताना गणेशोत्सव काळात सामाजिक व जनहिताचे उपक्रम राबवणे गरजेचे असून एका सीसीटीव्ही मुळे त्या परिसराचे चोवीस तास संरक्षण होत असल्याचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी सांगितले.

## घुगलवडगाव ,तांदळी दुमाला येथील शेतकऱ्यांचा पाईपलाईन प्रकल्पाला विरोध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव:**घुगलवडगाव ,तांदळी दुमाला येथे चारीचे बंद पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याचे काम झाल्यास एक किलोमीटर परिसरातील



शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असून तेथील फळबागा व जनावरांना पाणी उपलब्ध होणार नाही, तसेच परिसरातील विहिरींना पाणी फुटण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही, अशी भीती व्यक्त करण्यात आली. त्यामुळे या कामाकरिता ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र देऊ नये, असा ठराव ग्रामसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या ठरावाचे सुचक रोहिदास हरिश्चंद्र दांगडे तर अनुमोदक महादेव बापू पवार होते. दरम्यान, तांदळी दुमाला येथील संदीप विनायक रोडे व इतर शेतकऱ्यांनीही याच वितरिका क्रमांक १२ वर होणाऱ्या बंद पाईपलाईन प्रकल्पास विरोध दर्शवला. या अर्जावर चर्चा करून ग्रामसभेने देखील संबंधित कामाला विरोध दर्शवत ना हरकत प्रमाणपत्र न देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर केला. यावेळी सुचक संदीप विनायक रोडे तर अनुमोदक नितीन गौतम लगड होते.

निवेदन स्वीकारताना कुकडी पाटबंधारे विभाग येथे पुणेकर व सचिन काळे (उपकार्यकारी अभियंता, श्रीगोंदा) उपस्थित होते. तसेच या प्रसंगी रावसाहेब दांगडे, गणेश शेळके, बापूसाहेब शेळके, महेश पवार, शरद दांगडे, परशुराम दांगडे, अशोक काकडे, धनंजय पवार, महादेव दांगडे, दत्तात्रय पवार, अतुल पवार, शरद पवार, करण पवार, बाळासाहेब दांगडे, मच्छिंद्र दांगडे, सचिन दांगडे, युवराज म्हेत्रे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.ग्रामसभेच्या या ठरावामुळे वितरिका क्रमांक १२ वरील प्रस्तावित पाईपलाईन प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांचा कडवा विरोध स्पष्ट झाला आहे.ग्रामसभेत ऐनवेळेच्या विषयांतर्गत घुगलवडगाव येथील महादेव पवार व इतर शेतकऱ्यांनी दिलेल्या अर्जावर चर्चा करण्यात आली.

## मराठा आरक्षणाच्या या लढ्यात माझ्या गावाचाही खारीचा वाटा: वाबळे पाटील

### मढेवडगावातून मुंबई कडे रसद रवाना!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** फार पूर्वीपासून आमच्या पूर्वजांची निसर्ग असो की शत्रू कोंडी करत आलेला आहे! कोंडी फोडण्याचे कसब आमच्या रक्तात आहे.निर्सग तर नेहमीच कोंडी करतो तरी आमचे बापजादे त्याला भीक घालत नाहीत,हसत हसत त्याला सामोरे जाऊन त्याच्या छाताडावर नाचून स्वतःला सिद्ध करत आले आहेत!

छत्रपती शिवाजी महराजांनी त्यांच्या जीवनात असल्या कोंड्या अनेक वेळा फोडल्या आहेत,त्यांचेच वंशज आहोत! म हा रक्तात आहे,उपाशीपोटी राहून लढाई जिंकणे हे तर आमचे कसब आहे,जितकी कोंडी होईल तितका जोश निर्माण होतो!कोंडी केल्याने हतबल होतील हा विचार करण्या आगोदर आधी इतिहास तपासा!

कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ होऊ पाहणाऱ्या स्वजातीय व्यक्तींनी एकदा इतिहास तपासून त्यावेळी त्यांची झालेली फजिती अन् वर्तमानातील त्यांची लायकी तपासून बघावी! आम्ही कुणाचा द्वेष करणार नाही अन् आमच्या हक्काचे सोडणार नाही! खाण्यापिण्याची




कोंडी फोडण्यासाठी माझ्या मढवडगावकरांसोबतच. कारखाना परिसर तसेच जंगलेवाडी ग्रामस्थांनी देखील खारीचा वाटा देत संघर्ष योद्धा मनोज दादा जमरांगे पाटलांच्या मार्गदर्शनाखाली ही उभारलेल्या लढ्याला रसद पुरवण्याचे कार्य करणाऱ्या सर्व पक्षीय नेते व कार्यकर्त्यांसोबत विविध संघटनेचे पदाधिकारी व सर्वसामान्य जनता आणि सर्व जाती धर्मातील समाज बांधव लहान थोरांशी बहुसंख्येने हजर होता.

## बिरसा ब्रिगेडचे आंदोलन; एस टी बस सेवा विस्कळीत ,लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील विस्कळीत झालेली एसटी बस सेवा सुरळीत व्हावी यासाठी बिरसा ब्रिगेड सह्याद्री सातपुडा आंबेगाव तालुका यांच्या वतीने मंचर ता. आंबेगाव येथील एसटी स्टँडवर आदिवासी बांधवांच्या वतीने बेमुदत उपोषण करण्यात आले. उपोषण सुरू झाल्यानंतर काही वेळातच एसटी महामंडळाच्या वतीने सर्व मागण्या मान्य करत लेखी आश्वासन दिल्याने बिरसा ब्रिगेड व आदिवासी बांधवांनी आंदोलन मागे घेतले. मंचर एसटी आगाराच्या माध्यमातून आंबेगाव तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागात एसटी बस वेळेत पाठवल्या जात नाहीत. बस येण्यासाठी दोन ते तीन तास उशीर होतो त्यामुळे आदिवासी दुर्गम भागात जाणाऱ्या नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. तसेच भीमाशंकर येथे जाणारे एसटीच्या फेऱ्या देखील कमी करण्यात आल्या आहेत. जांभोरी व आहुपे या मुख्य बस वेळेवर सोडल्या जात नाही, त्यामुळे आदिवासी भागातील विद्यार्थी रुग्ण शेतकरी महिला यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत एसटी महामंडळाकडे वारंवार तक्रार करू नही दखल घेतली जात नव्हती त्यामुळे आंबेगाव तालुक्यातील आदिवासी बांधव व बिरसा ब्रिगेड सह्याद्री सातपुडा यांच्या वतीने सोमवार दि.१सप्रोटेंबर रोजी मंचर बस स्थानकावर आंदोलन करण्यात आले. आंदोलनात आदिवासी बांधवांनी एसटी महामंडळाच्या



कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त केल्यानंतर एस टी महामंडळाचे अधिकाऱ्यांनी आंदोलकांची भेट घेत त्यांच्या मागणी मान्य केल्या तसेच याबाबत लेखी आश्वासन देत आदिवासी भागातील बस वेळेवर सोडल्या जातील सर्व फेऱ्या पूर्ण क्षमतेने व नियमित सुरू केल्या जातील असे आश्वासन दिले आहे. यावेळी सरपंच चंद्रकांत लोहकरे, बिरसा ब्रिगेडच्या आंबेगाव तालुका अध्यक्ष संतोष तिटकारे, मनसेचे वैभव बानखेले यासह विविध संघटनाचे पदाधिकारी आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाश्वत संस्था मंचर यांच्या कडून १ ते ६ वयोगटातील १०० मुलांना पोषक आहाराचे किट वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**डिंभे :** आंबेगाव तालुक्यातील गंगापूर खुर्द येथून सार्वजनिक गणपती उत्सवानिमित्त शिवशक्ती मित्र मंडळ गंगापूर खुर्द व ग्रामपंचायत गंगापूर खुर्द यांच्या संकल्पनेने व शाश्वत संस्था मंचर यांच्या आर्थिक सहकार्याने एक ते सहा वयोगटातील १०० मुलांना गंगापूर खुर्द येथील गावठाण विठ्ठलवाडी ,गाडेकर वाडी, ठाकरवाडी, बांगरवाडी ,आपटी ,खेतेपठार या ठिकाणी पोषक आहाराचे किट वाटप करण्यात आले. या किटमध्ये रवा, पोहे, गुळ लापशी विविध प्रकारच्या डाळी शेंगदाणे दूध यांचा समावेश होता. देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे या उक्तीप्रमाणेच गणेश उत्सवानिमित्त हा आगळा वेगळा उपक्रम म्हणून शाश्वत संस्था यांच्याशी चर्चा करून एक ते सहा वयोगटातील मुलांना पोषण आहार किट वाटप करण्यात आल्यानंतर मुलांच्या पालकांनीही समाधान व्यक्त केले.यावेळी सरपंच कविता



सातकर, उपसरपंच पांडुरंग ठोसर, ग्रामसेवक झांजरे भाऊसाहेब, ग्रामपंचायत सदस्य विशाल नरवडे, राजू गवारी, शिवशक्ती मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब येवले, शाश्वत संस्थेचे विश्वस्त सुरेश राजवाडे, प्रतिभा तांबे ,शांताराम गुंजाळ ,मंडळाचे सभासद दत्तात्रय गुंजाळ, संतोष सातकर ,देवस्थानचे अध्यक्ष काशिनाथ शेठ वावरे, विश्वस्त सुनील ठोसर, देवस्थानचे सचिव संजय येवले ,प्राध्यापक सुनील नेवकर ,बालेश येवले, अंगणवाडी सेविका अशा वर्कर सर्व महिला ग्रामस्थ ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गंगापूर खुर्द मध्ये प्रत्येक घटकाचा विकास करण्याचा आमच्या संस्थेचा उद्देश असून या विकासाच पहिलं पाऊल म्हणून हा उपक्रम राबवला असल्याचा शाश्वत संस्थेचे विश्वस्त यांच्याकडून बोलण्यात येत आहे.

# हिवरे बाजार सार्वजनिक उत्सवांचा आदर्श :पोलीस अधीक्षक घार्गे

### ‘सिंदूर ऑपरेशन’ देखाव्याचे उद्घाटन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** सार्वजनिक सण-उत्सव शांततेत कसे साजरे करावेत आणि लोकसहभाग कसा वाढवावा, हे हिवरे बाजार गावाकडून शिकण्यासारखे आहे, असे प्रतिपादन जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. हिवरे बाजार येथील ‘एक गाव, एक गणपती’ या उपक्रमाच्या तिसाव्या वर्षानिमित्त श्री. घार्गे यांच्या हस्ते श्री गणेश आरती तसेच 'सिंदूर ऑपरेशन' देखाव्याचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी घार्गे म्हणाले, सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाने सादर केलेला सिंदूर ऑपरेशन देखावा ही अतिशय उत्कृष्ट संकल्पना आहे. हिवरे बाजार येथे मागील ३० वर्षांपासून पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून ‘एक गाव, एक गणपती’ ही संकल्पना अखंडितपणे सुरू आहे आणि पुढेही राहील. या उपक्रमाचा आदर्श इतर गावांनीही




घ्यावा. ते पुढे म्हणाले की, सार्वजनिक सण-उत्सव शांततेत पार पाडावेत म्हणून पोलीस प्रशासन मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत असते, मात्र त्यात नेहमी यश मिळतेच असे नाही. अनेक छोट्या गावांमध्ये गणपती मंडळांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, काही ठिकाणी वाईट चालीरीतींना थारा दिला जातो. त्यामुळे व्यसनाधीनता व गुन्हेगारीचे प्रमाण वाढते आहे. यावर वेळीच पायबंद घालण्याची गरज आहे. कार्यक्रमाला राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन महाराज स्वामी यांचे परमशिष्य महान तपस्वी बालब्रह्मचारी महंत १०८ स्वामी सोमेश्वरानंद गिरीजी महाराज (सुसंस्कार संस्था, शिवटेकडी ता. मालेगाव, जि. नाशिक) उपस्थित होते. ते म्हणाले, हिवरे बाजार गावात एकीचे मोठे बळ आहे. प्रत्येकाने कष्टातून गावाचा विकास साधला आहे. या वेळी पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते मान्यवरांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमास सरपंच विमलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, हरिभाऊ ठाणगे , सखाराम पादीर , रोहिदास पादीर, राजेंद्र वनाजी ठाणगे, अभय ठाणगे, तसेच तरुण मंडळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द • ख • ल

## आळंदीत गणेश विसर्जनासाठी कृत्रिम हौदांची सोय

**आळंदी :** गणेशोत्सवाच्या काळात दरवर्षी इंद्रायणी नदीत होणाऱ्या मूर्ती विसर्जनामुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी आळंदी नगरपरिषदेने यंदाही कठोर पावले उचलली आहेत. नदीत मूर्ती विसर्जनास बंदी घालून भाविकांसाठी शहरात पाच ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे उभारण्यात आली असून कृत्रिम पाण्याचे हौद उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आता पर्यंत अनेक गणेश मूर्त्या भक्तांकडून संकलित झाल्या. संकलन केंद्रे वैतागेश्वर मंदिराजवळ, झाडी बाजार वाहनतळ, वाय जंक्शन, केंद्रे महाराज मठ आणि जुने नगरपालिका कार्यालय येथे उभारण्यात आली आहेत. प्रत्येक केंद्रावर निर्माल्य संकलनासाठी घंटागाड्या व ट्रॅक्टरची सोय केली असून, भाविकांना स्वच्छ व पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करता यावे यासाठी नगरपरिषदेतर्फे पाच पथकप्रमुख, सहाय्यक प्रमुख व एकूण ७५ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

विसर्जनाच्या अखेरच्या दिवसापर्यंत ही सुविधा उपलब्ध राहणार आहे. यामुळे इंद्रायणी नदी प्रदूषणापासून वाचण्यास मदत होऊन, गणेशोत्सव पर्यावरणपूरक वातावरणात साजरा होईल असे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले आहे.

## कापसाचा आयात शुल्क रद्द ; अध्यादेशाची होळी करत शेवगावात निषेध

**शेवगाव :** केंद्र सरकारने अमेरिकन कापूस आयातीवर अकरा टक्के आयात शुल्क रद्द केल्याच्या निर्णयाचा परिणाम भारतीय कापूस उत्पादकांवर होऊन शेतकऱ्यांना प्रति क्विंटल तीन ते चार हजार रुपये कमी भाव मिळेल. त्यामुळे केंद्र सरकारचा अध्यादेश शेतकऱ्यांना अडचणीत आणणारा असून तो निषेधार्ह आहे, अशी टीका भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. सुभाष लांडे यांनी केली.

अखिल भारतीय किसान सभा व संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने दि. १,२,३ सप्टेंबर रोजी केंद्र सरकारच्या या निर्णयाला विरोध



करण्यासाठी देशव्यापी आंदोलन पुकारले आहे. त्याचाच एक भाग म्हणून मंगळवारी ( दि.२) शेवगाव येथील क्रांती चौक येथे आंदोलन करत त्या अध्यादेशाची होळी करण्यात आली.

यावेळी बोलताना लांडे म्हणाले की, केंद्र सरकारने कापसा वरील ११टक्के आयात शुल्क रद्द केल्यामुळे, भारतीय कापूस उत्पादक शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात हानी होणार आहे.अमेरीकेने भारतावर ५० टक्के टेरीफ लावले आहे. मात्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकारने अमेरिकन कापूस आयातीवरील ११टक्के असलेली करमाफी केली आहे. त्या मुळे भारतीय कापूस उत्पादक शेतकऱ्यांना तीन ते चार हजार रुपये प्रतिक्विंटल कमी भावात कापूस विकावा लागणार असून शेतकरी आर्थिक संकटात येतील. केंद्र सरकारने हा अध्यादेश तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी लांडे यांनी केली.

या आंदोलनात कॉ. संदीप इथापे, कॉ. भगवानराव गायकवाड, कॉ. बापूराव राशिनकर ,कॉ. बबनराव पवार ,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे ,कॉ. दत्तात्रय आरे, कॉ. रामभाऊ लांडे, कॉ. विष्णू गोरे, कॉ. भिवा घोरपडे, कॉ. बाबूलाल सय्यद, कॉ. विठ्ठल उगले आदी व कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गावाचं खाल्ले आता देवाचेही खाल्ले हिशेबासाठी जरे यांचे एकदिवसीय उपोषण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** ;- आषाढी वारी म्हणजे वारकऱ्यांचा दिवाळी पेक्षाही मोठा उत्सव आणि त्याची बडदास्त ठेवण्यासाठी सरकारी मदत देऊन भक्तिमय आनंदात भर पाडली जाते. मात्र याचा दिंडी वारीच्या आलेल्या सरकारी अनुदानातुन मोठ्या घोटाळ्याने जन्म घेतला असून याच्या हिशेबासाठी संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष यांनी पंचायत समिती समोर आमरण उपोषण सुरु केले होते, मात्र रात्री उशिरा लेखी आश्वसन मिळाल्याने आमरण स्थगित करण्यात आले आहे . पूर्वी इतिहासात एक म्हण प्रचलित होती गावाचं भावाचं आणि त्याचबरोबर देवाचं खाऊ नये ते पचत नाही. मात्र तालुक्यातील गावकीमधील नेत्यांनी या म्हणीचा अर्थच बदलून आम्ही गावाचं भावाचं आणि त्याचबरोबर देवाचं आवडीने खाणारच अशी बनवली आहे कि काय? असा प्रश्न सर्व सामान्य नागरिकांना पडला आहे. त्याचा प्रत्यय तालुक्यातून जाणाऱ्या पायी वारी दिंडी सोहळ्यासाठी देवदैठण,बेलवंडी,घोगरगाव ,टाकळी कडेवळीत श्रीगोंदा यासह अनेक गावाला आलेल्या सरकारी अनुदानात मोठ्या प्रमाणात घोटाळा झाला असून पायी दिंडी वारीसाठी सुखसोई पुविण्यासाठी शासनाकडून पंचायत समितीमार्फत ग्रामपंचायतींना लाखो रुपयांचा निधी देण्यात आला. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अफरातफर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर खर्चाचा हिशोब सादर करण्यासाठी मागणी करत संभाजी ब्रिगेड पक्षाचे तालुकाध्यक्ष शाम जरे यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण आंदोलन सुरू केले होते मात्र रात्री उशिरा प्रशासनाच्या वतीने श्रीगोंदा पंचायत समिती प्रशासनातील थोरात , मुकुंद पाटील तसेच विस्तार अधिकारी यादव व सारिका हराळ यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून खर्चाचा दोन ग्रामपंचायतीचा काही हिशोब उपलब्ध करून दिला तसेच उर्वरित तपशील हिशोब लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे लेखी आश्वासन दिले.यानंतर उपोषण आंदोलन तात्पुरते स्थगित करत असल्याचे शाम जरे यांच्याकडून सांगण्यात आले.

आंदोलनाची पमार्श्वभूमी दोन महिन्यांपूर्वी पंढरपूर पायी दिंडी वारीसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने निधी दिला होता. वारीनंतर १५ ते २० दिवसांच्या आत ग्रामपंचायतींनी खर्चाचा हिशोब पंचायत समितीकडे सादर करणे बंधनकारक होते. मात्र एकाही ग्रामपंचायतीने तो हिशोब सादर न केल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.याबाबत ३ ऑगस्ट २०२५ रोजी संभाजी ब्रिगेडने पंचायत समितीकडे निवेदन दिले होते. तसेच ११ ऑगस्ट रोजी गजर आंदोलनही झाले होते. तरीसुद्धा खर्चाचा तपशील उपलब्ध न झाल्याने अखेर तालुकाध्यक्ष शाम जरे यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे

आंदोलनास उपस्थिती या उपोषण आंदोलनाला संत नामदेव तुकाराम वारकरी आघाडी जिल्हाध्यक्ष माऊली होरे, शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष दिलीप आबा वाळुंज, उपाध्यक्ष दिलीप लबडे, प्रफुल्ल उर्फ बापु जगताप, संदिप जगताप, मुख्यसचिव सुयोग धस, अल्पसंख्याक आघाडी तालुकाध्यक्ष सद्दाम शेख, शेतकरी आघाडी उपाध्यक्ष पांडुरंग खोरे, संघटक संतोष आरडे मेजर तसेच अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग होता.

## श्री गणेश कारखान्याच्या कामगारांची देणी अदा

### विवेक कोल्हेंनी गणेश कर्मचाऱ्यांना दिलेला शब्द केला पूर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव:** श्री गणेश सहकारी साखर कारखान्याने कामगार बांधवांचा दीर्घकाळ प्रलंबित देणी असलेला प्रश्न युवा नेते विवेक कोल्हे यांनी मार्गी लावत मोठा दिलासा दिला आहे. कारखान्याच्या स्थापनेपासून कामगारांनी केलेल्या योगदानाची दखल घेत १९८८ पासून थकीत असलेली देणी व २०१७ पासून निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी, तसेच कार्यरत कर्मचाऱ्याची देणी अदा करण्यात आली असून कामगारांना यामुळे दिलासा मिळाला आहे. यासह २०१७ पासून निवृत्त झालेल्या कामगारांची मिळून तब्बल ६ कोटी ६५ लाख रुपयांची थकबाकी रक्कम मंजूर करून देण्यात आली आहे. प्रोव्हिडंट फंड आणि ग्रॅज्युटी,फरक,थकीत पगार या थकबाकीचा निपटारा झाल्यामुळे पाचशे कार्यरत कर्मचारी व दोनशे सेवानिवृत्त कर्मचारी यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे कामगारांच्या आयुष्यात नवी ऊर्जा निर्माण झाली असून हा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल त्यांनी गणेश कारखान्याचे मार्गदर्शक व जिल्हा बँकेचे संचालक, युवानेते विवेक कोल्हे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. या प्रसंगी बोलताना विवेकभैय्या कोल्हे म्हणाले की, कामगार बांधवांचे प्रश्न सुटले पाहिजेत, यासाठी कारखाना सुरळीत चालणे आवश्यक आहे. ही भूमिका ठामपणे मांडत आम्ही अनेक निर्णय घेतले आणि त्यातून बहुतांशी प्रश्न मार्गी लागले आहेत. उर्वरित प्रश्न सोडवण्यासाठीही आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. सहकार चळवळ टिकवण्यासाठी शेतकरी सभासद, कारखाना कर्मचारी आणि संचालक मंडळ या तिहेरी ऐक्याची आवश्यकता असते. या ऐक्यामुळेच गणेश सहकारी साखर कारखान्याची गाडी सुरळीत धावते आहे. कामगारांची थकीत देणी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध होतो, त्यावेळी जो विश्वास दिला होता त्याची फलश्रुती आज प्रत्यक्षात दिसून आली आहे. कामगारांच्या थकीत प्रश्नांची उकल आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या देणगीची वेळेत सोडवणूक यामुळे गणेश कारखाना हा केवळ उत्पादनकेंद्र न राहता कामगारांचे खरे आश्रयस्थान असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# वैजापूर पोलीस ठाणे हद्दीतील २३ गुन्हेगारांच्या हद्दपारीचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** तालुक्यातील शहरात व ग्रामीण भागातील उपविभागीय अधिकारी यांनी वैजापूर पोलिस ठाणे हद्दीतील २३ जणांना सहा सप्टेंबर पर्यंत वैजापूर हद्दीतून हद्दपार करण्याचे आदेश पारित केले आहे. सार्वजनिक गणेशोत्सवात काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून वारंवार शरीरा विरुद्धचे गुन्हे करणाऱ्यांना हद्दपार करण्याबाबतचा प्रस्ताव वैजापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे सादर केला होता.या अहवालाच्या अनुषंगाने वैजापूर पोलिस ठाणे हद्दीत कायद्याला न जुमानणाऱ्या २३ जणांना ६ सप्टेंबर पर्यंत हद्दपार करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी डॉक्टर अरुण जऱ्हाड यांनी पारित केले आहे.यासोबतच वीरगाव व शिऊर हद्दीत वारंवार कारवाई करूनही अवैध रित्या दारूची विक्री करणाऱ्या १८ जणांना देखील हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

यांना केले हद्दपार सम्राट विजयसिंग राजपूर रा. रोटेगाव,अमोल उत्तम मोरे रा.रेणुका नगर वैजापूर,अमोल अनिल सोनवणे रा. रेणुका नगर वैजापूर,गौरव विजय भुजबळ रा. परदेशी मढी वैजापूर,वृषभ जितेंद राजपूत रा. परदेशी मढी वैजापूर,अशुतोष बाबासाहेब बोडखे रा. वैजापूर,अजयसिंग बाबुसिंग राजपूत रा. रोटेगाव,संतोष बाळनाथ मापारी रा. मुळे गल्ली वैजापूर,सोमेश पोपट गायकवाड रा. रेणुका नगर वैजापूर,फरहान फरीद शेख रा. आनंद नगर वैजापूर,गुजेंद्र उर्फ गजु रविंद्रसिंग राजपूत रा. परदेशी मढी वैजापूर,निलेश दिपक राजपूत रा. परदेशी मढी वैजापूर,अफजर अर्शद सयद रा. काझी गल्ली वैजापूर,अमेरसिराज पठाण रा. खान गल्ली वैजापूर,शुभम उर्फ रावण गौरख पवार रा. दुर्गा नगर वैजापूर,अर्शद अशोक राजपूत रा. परदेशी गल्ली वैजापूर,पवनसिंग राजुसिंग राजपूत रा. इंगळे गल्ली वैजापूर,शेख अलतमाश शेख हनीफ रा. पिरिजात गल्ली वैजापूर,अबरार शेरु पठाण उर्फ चुन्नु रा. पिरजात गल्ली वैजापूर,नाझीर राजू पठाण रा. खंडोबा नगर वैजापूर,शेख तासीफ शेख हनीफोददीन रा.पिरजात गल्ली वैजापूर,फैजान शेख फरीद शेख रा पॅराडाईस कॉलनी वैजापूर,सोहेल तनवीर कादरी रा.कादरी नगर वैजापूर अशी वैजापूर पोलिस ठाणे हद्दीतील हद्दपार करण्यात आलेल्यांची नावे आहे. वारंवार कारवाई करूनही दारू विक्री करणाऱ्या या १८ जणांना केले हद्दपार किरण बाळु गायकवाड (नागमठाण,ठकचद चांगदेव डोंगरे(लाडगाव),गणेश शीवाजी रोठे(डागपिंपळगाव),उत्तम निवृत्ती मोरे(पाणवी),सचीन रमेश मोरे(सिरसगाव),कययूम गुलाब पठाण(जातेगाव)सुनिल यादव आव्हाड(वीरगाव) जिवन गजानन त्रिभुवण(कापूसवाडगाव)गोकुळ सुदाम सोमवंशी(म्हस्की)या वीरगाव पोलिस ठाणे हद्दीतील ९ जणांना हद्दपार करण्याचे आदेश केले तर शरद संपत शींदे(शिऊर),संदीप वसंत शींदे(शिऊर),प्रल्हाद वसंत मोरे(शिऊर),अणा जगन्नाथ गायकवाड(बाभूळगाव बू.)भाऊसाहेब सुभाष पवार(बोलणी)महेश अंबादास साळुके(मनुर)संदीप विठल दंवगे(मनुर)रमेश शाहूलाल सोनवणे(तलवाडा) अशा शिऊर पोलिस ठाणे हद्दीतील ९ जणांना हद्दपार करण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहे.

## प्रामाणिक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळेच संस्था मोठी होते : हर्षदाताई काकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** - जीवनात चांगले कर्म करा त्या कर्माचे फळ चांगलेच मिळते. आपल्या वाटयाला जे काम आले ते हसतमुखाने स्वीकारा. संस्था मोठी झाली ती प्रामाणिक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळेच असे प्रतिपादन माजी. जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे यांनी केले. चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चापडगावमध्ये मंदाकिनी खंडागळे , भगवान वाघमारे , सुनिता वराडे यांचा कृतज्ञता सोहळा कार्यक्रम संपन्न झाला प्रसंगी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मणराव बिटाळ हे होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्या अंजली चिंतामण प्रा. वंदना पुजारी , प्रा.अशोक आहेर , पर्यवेक्षक अनिल मगर , अशोक आघवणे प्राचार्य संजय चेमटे , अशोक ढाकणे , रोहिदास पातकळ , अशोक पोपळे , भुजंगराव गरुड , मधुकर गरगडे , अण्णासाहेब गोरे , सखाराम घावटे , मयुरी काळे , आजिनाथ विघ्ने ,संजय भवर ,बापूसाहेब डमरे आदी मान्यवर उपस्थित होते.



सौ काकडे पुढे म्हणाल्या की ,जन्मापासून मृत्यूपर्यंत कृतज्ञता पाळणे हे आपले सर्वांचे कार्य आहे. संस्था त्यांच्या कष्टातूनच मोठी झाली आहे. प्रत्येकाने संधीच सोनं करावं.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मणराव बिटाळ म्हणाले की , कृत – म्हणजे उपकार ज्ञ –म्हणजे जाणणारा किंवा ओळखणारा व त्या – म्हणजे त्याबद्दल भावना व्यक्त करणारा. हा सर्व सोहळा म्हणजे कृतज्ञता सोहळा होय. उपकाराप्रति भावना व्यक्त करणे म्हणजे कृतज्ञता होय.चांगल्या सुसंस्कारित लोकांचीच कार्यक्रम मोठे होत असतात. शिक्षक प्रतिनिधी म्हणून शीतल दहिवाळकर , संस्था प्रतिनिधी वंदना पुजारी यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. या सत्काराला मंदाकिनी खंडागळे , भगवान वाघमारे ,सुनीता वराडे , मयुरी काळे यांनी साश्रूनयनाने उत्तर दिले. मनोगत व्यक्त करणे करताना त्यांचा कंठ दाटून आला होता. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन व स्वागतगीताने झाली. यासाठी सुभाष मोहिते , प्रभाकर मराठे , केशव वाघमारे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दादासाहेब ज्योतीक ,सर्जेराव निकाळजे यांनी केले तर आभार भाऊसाहेब गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक , शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले .

## रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये गणेशोत्सवानिमित्त भक्ती संगीताचा कार्यक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये गणेशोत्सव निमित्त भक्ती संगीताचा कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला .या कार्यक्रमांमध्ये प्राध्यापक संगीत विशारद शेखर बाबुराव दरवडे यांनी स्वतंत्र समूह तबला वादन केले. त्यामध्ये शास्त्रीय तबला वादनातील तीन ताल, तुकडे, केरवा ठुमरी, दादरा व ढोलकी वादन केले तसेच कार्यक्रमाची रंगत तबल्यावरती ट्रेनचा आवाज व घोड्यांच्या टापांचा आवाज, चर्म वाद्यावरती निर्माण केला. त्यांनी केलेल्या तबला वादनामध्ये सर्व विद्यार्थी अतिशय दंग झाले होते. सर्व विद्यार्थ्यांनी तबल्याच्या ठेक्यावर टाळ्यांचा ताल धरला .या गणेश चतुर्थी निमित्त तबल्यावरती विविध ताल व विद्यार्थ्यांच्या टाळ्यांचा गजर असा सुमधुर तालाचा एकमेव संगीताचा नजराणा या ठिकाणी सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संगीत विशारद नेहा दरवडे यांनी गणरायाची आरती व गणरायाची भक्ती गीते गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचे गीते विद्यार्थ्यांसमोर सादर केले. तेजस महाराज नलवडे यांनी भक्तीमय संगीताचा सूर धरला. याप्रसंगी शास्त्रीय संगीत क्लासचे विद्यार्थी विराज लवांडे यांनी तबला साथ दिली व अनुज दरवडे संगीतातील चार परीक्षा उत्तीर्ण यांनीही तबल्याची साथ दिली. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक कचरू शिंदे ,विद्यालयाचे ग्रंथपाल भाऊसाहेब वेताळ आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील संगीत शिक्षक दिपक भारस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अमृतवाहिनी फार्मसीला तिसऱ्यांदा ‘सर्वोत्कृष्ट (एक्सलेंट) महाविद्यालय’ दर्जा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था संचालित अमृतवाहिनी पदविका औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे करण्यात आलेल्या बाह्य संस्था अवेक्षणामध्ये सलग तिसऱ्यांदा ‘‘सर्वोत्कृष्ट (एक्सलेंट) ‘‘महाविद्यालय दर्जा प्राप्त झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.पी. शिरभाते यांनी दिली आहे. दि. ०१ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बाह्य संस्था अवेक्षण समितीद्वारे प्रत्यक्षपणे शैक्षणिक गुणवत्ता, सोयीसुविधा, विविध उपक्रम इ.च्या आधारे ३०० गुणांचे अवेक्षण करण्यात आले व दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी बाह्य संस्था अवेक्षण मूल्यांकनाच्या आधारे सर्वोत्कृष्ट महाविद्यालय दर्जा जाहीर करण्यात आला. अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालय हे विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीयुक्त महाविद्यालय असून विद्यार्थ्यांना प्रशस्त इमारती सोबतच सुसज्ज लॅबोरेटरी, ग्रंथालय, इंटरनेट, मुलामुलींसाठी स्वतंत्र होस्टेल, अनुभवी व उच्चशिक्षित प्राध्यापक वर्ग तसेच अदययावत सोयी सुविधा पुरविल्या जातात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी व्यक्तिमत्व विकास शिबीर, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण असे विविध उपक्रम महाविद्यालयात राबविले जातात. व्यक्तिमत्व विकाससोबतच विद्यार्थ्यांनी सामाजिक बंधिलकी म्हणुन वेगवेगळ्या ठिकाणी विविध आजार, त्यावरिल उपचार व मेडिसिनस याबद्दल जनजागृती रॅलीचे आयोजन केले जाते.



तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महाविद्यालयात दरवर्षी वेगवेगळ्या कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्युह, विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या विषयांवर गेस्ट लेक्चर्स, तसेच विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास उंचविण्यासाठी विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्वांच्या व्याख्यानांचे वेळोवेळी आयोजन केले जाते.

विद्यार्थ्यांना औषधनिर्माणक्षेत्रातील संशोधन, विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफीशीयल इंटेलिजन्स), ड्रग डिस्कव्हरी तसेच नवनवीन संधी याविषयी माहिती मिळावी यासाठी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे देखील आयोजन केले जाते. या परिषदेत भारतासह अमेरिका, थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया व इतर देशविदेशातील नामवंत तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित केले जाते. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विदेशात संशोधनाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी विदेशातील विद्यापीठांसोबत सामंजस्य करार देखील केले आहेत. या सर्व उपक्रमांची व महाविद्यालयाच्या कामगीरीची दखल घेत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्याकडून ‘‘सर्वोत्कृष्ट‘‘ औषधनिर्माणशस्त्र महाविद्यालय‘‘ दर्जा जाहीर करण्यात आलेला आहे. संस्थेचे अध्यक्ष व मा. शिक्षणमंत्री लोकनेते लोकनेते बाळासाहेब थोरात, संस्थेचे विश्वस्त मा.आ.डॉ. सुधिर तांबे, कारखान्याचे संचालक इंद्रजितभाऊ थोरात, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्थ सौ. शरयुताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी .ए. बी. शिंदे, अकॅडमीक डायरेक्टर डॉ. जे.बी. गुरव यांनी महाविद्यालयाच्या या कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरभाते एम.पी., सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## मांचीहिल संस्थानच्या बाप्पाला उत्सहात निरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वि :** सालाबादप्रमाणे याही वर्षी मांची हिल संस्थानातील विवध युनिट मध्ये पाच दिवसीय गणरायाची मोठ्या थाटात विधिवत स्थापना करण्यात आली होती. ढोल ताशांच्या गजरात पारंपारिक पद्धतीने मिरवणुकीने गणरायांचे आगमन झाले. पाचही दिवस प्रत्येक युनिट मध्ये सकाळ संध्याकाळ अनेक मान्यवरांच्या हस्ते गणपतीची आरती करण्यात आली. सदर कालावधीत विवध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रक्तदान शिबीर, खेळाच्या स्पर्धा, विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर करण्यात आले. प्रत्येक युनिट मध्ये सत्यनारायण महापूजा संपन्न झाली. यामध्ये अश्विन रुरल आयुर्वेद महाविद्यालय, अश्विन रुरल आयुर्वेद हॉस्पिटल, अश्विन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ज्ञानगंगा विद्यानिकेतन प्राथमिक, माध्यमिक, व जुनिअर कॉलेज, सूर्या नर्सिंग कॉलेज (बी.एस्सी., जी.एन.एम., ए.एन.एम.), ए.पी. जे.अब्दुल कलाम आय.टी.आय. कॉलेज, एकलव्य अध्यापक विद्यालय, महाराजा यशवंतराव होळकर पब्लिक स्कूल, या सर्व युनिट मध्ये पाच दिवशीय गणेशाची स्थापना करण्यात आली होती.



सर्व युनिट मध्ये विविध वाद्याच्या गजरात दुपारपासूनच विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. सर्व गणपती मिरवणूक मुख्य चौकात एकत्र येत भव्य मिरवणुकीत रुपांतर झाले. बालवाडी पासून तर मेडीकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वच मिरवणुकीत दंग होऊन गेले. अश्विन आयुर्वेद महाविद्यालयाच्या गणपतीची सजवलेल्या अश्वरथातील मिरवणूक व विद्यार्थ्यांचे गणेशवंदना हे नृत्य विशेष आकर्षण ठरले. महाविद्यालयाची श्रीराम व हनुमानासह असलेली अतिशय देखणी व भव्य गणेशमूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. सायंकाळी ६ वाजता प्रवरा डाव्या कालव्यामध्ये सर्व गणपती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक यांच्या सह सर्व विभागाचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या व अश्विन रुरल आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने स्वतंत्र महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी संसद व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री



## श्रीरामूरचे गणेश दर्शन



थत्ते ग्राउंड चा राजा अष्टविनायक मित्र मंडळ



पूर्णवाद नगर म्हसोबा महाराज मित्र मंडळ



शिवराणा तरुण मंडळ संगमनेर रोड



योद्धा ग्रुप गिरमे चौक



छत्रपती शिवाजी महाराज रोड चा राजा (छाया-अमोल कदम)

# विनापरवाना घोडागाडी शर्यत भोवली; बुऱ्हाणनगरमध्ये हाणामाऱ्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बुऱ्हाणनगर परिसर सोमवारी दोन स्वतंत्र मारहाणीच्या घटनांनी हादरला. जुन्या वैमनस्यातून दोन तरुणांना मारहाण करून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या असून, याप्रकरणी चार जणांविरुद्ध कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसरीकडे, तालुक्यातील नारायणडोह शिवारात परवानगीशिवाय घोडागाडी शर्यत भरवणाऱ्या चार आयोजकांवरही पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.



### बुऱ्हाणनगरमध्ये सलग दोन हाणामाऱ्या

दुपारी अभिषेक गोरख धाडगे (२०, रा. धाडगेमळा, कापुरवाडी) हा मोटारसायकलवरून जात असताना अनिल टेलरच्या दुकानाजवळील चौकात ओंकार कैलास शेलार व सिद्धार्थ चंद्रकांत महेत्रे (दोघे रा. बुहाणनगर, देवी मंदिराजवळ) यांनी त्याला अडवले. जुन्या वादातून त्यांनी अभिषेकला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून नादी लागशील तर जीवे मारू अशी धमकी दिली.

सायंकाळी पाचच्या सुमारास दुसरी घटना घडली. सलमान रफिक शेख (२५, रा. कापुरवाडी) हा मोटारसायकलवरून जात असताना गुगळे फार्महाऊसजवळ गालीब खान व रेहान खान (दोघे रा. बुहाणनगर, देवी मंदिराजवळ) यांनी त्याला अडवले. तू नेहमी खुन्नसने का पाहतोस? असे म्हणत सलमानवर हल्ला केला. दोघांनी त्यालाही जीवे मारण्याची धमकी दिली. या दोन्ही घटनांचा तपास भिंगार पोलीस करीत आहेत.

### परवानगीशिवाय घोडागाडी शर्यत

दरम्यान, नगर तालुक्यातील नारायणडोह गावच्या शिवारात वाळुंज बायपास ते सारोळा बद्धी बायपासदरम्यान रविवारी (ता. ३१ ऑगस्ट) परवानगीशिवाय घोडागाडी (टांगा) शर्यत भरवण्यात आली.

करण युवराज बेरड, अजय विलास जाधव, मनोज बारस्कर व शिवा राऊत (पूर्ण पत्ता माहिती नाही) या चौघांविरोधात अहिल्यानगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या शर्यतीत २० ते २५ घोडागाड्या, १०० ते १५० पशुपालक तसेच शेकडो प्रेक्षक सहभागी झाले होते.घोडागाड्या पळवताना चालकांनी घोड्यांना चाबकाने मारल्याने प्राण्यांवर क्रूरतेचा प्रकार घडला. शिवाय, शर्यतीदरम्यान रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांना मोठी अडचण झाली. पोलिसांनी शर्यतीबाबत परवानगीची विचारणा केली असता आयोजकांकडे कोणतेही परवाने नसल्याचे स्पष्ट झाले. पोलिस हवालदार रमेश शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवला आहे.

# 'शिर्डी-मुंबई' ला राहुरी रेल्वे स्टेशनवर थांबा !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शिर्डी-मुंबई साई फास्ट पॅसेंजर या रेल्वे गाडीला राहुरी रेल्वे स्टेशन येथे अखेर थांबा मिळाल्याने प्रवासी वर्गातून समाधान व्यक्त केले जात असून दि. ३ सप्टेंबर पासून या गाडीला नियमित थांबा देण्यात आला आहे.







रेल्वे विभागाने जाहीर केलेल्या नवीन वेळापत्रकानुसार दि. ३ सप्टेंबर २०२५ पासून मुंबई-शिर्डी साई फास्ट पॅसेंजर (गाडी क्रमांक ११०४१) ही गाडी सकाळी ७.०० वाजता राहुरी रेल्वे स्टेशन येथे थांबणार आहे व शिर्डी-मुंबई साई फास्ट पॅसेंजर (गाडी क्रमांक ११०४२) ही गाडी रात्री १०.३० वाजता राहुरी रेल्वे स्टेशन येथे थांबणार आहे. या गाडी व्यतिरिक्त सध्या फक्त एकमेव निजामाबाद - पुणे पॅसेंजर गाडी दुपारी १.०० वाजता तर दौंड-निजामाबाद पॅसेंजर गाडी संध्याकाळी ७.२० वाजता राहुरी रेल्वे स्टेशन येथे थांबत आहे.दरम्यान राहुरी रेल्वे स्टेशन येथे सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध होऊन देखील अनेक महत्त्वाच्या गाड्यांना थांबा नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून शिर्डी-मुंबई फास्ट पॅसेंजरला थांबा मिळाल्याने प्रवासी वर्गातून मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. याबरोबरच पूर्वी सुरू असलेल्या पुणे-नांदेड पॅसेंजर, पुणे- मनमाड पॅसेंजर, पुणे- जम्मूतवी झेलम एक्सप्रेस, महाराष्ट्र एक्सप्रेस, पुणे-अमरावती एक्सप्रेस या गाड्यांना थांबा मिळावा अशी मागणी माजी खा.प्रसादराव तनपुरे, आ.शिवाजीराव कर्डिले, माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील, रेल्वे सल्लागार समिती, रेल्वे प्रवासी संघटना, स्थानिक ग्रामस्थ व नागरिक यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडे केलेली आहे.

### आता 'वंदे भारत'ला थांबा मिळावा : आ.कर्डिले

राहुरी रेल्वे स्टेशन येथे शिर्डी मुंबई साई फास्ट पॅसेंजरला थांबा मिळाला ही समाधानाची बाब असून यापूर्वी सुरू असलेल्या व सध्या बंद असलेल्या पुणे-नांदेड पॅसेंजर, पुणे-मनमाड पॅसेंजर या रेल्वे गाड्या सुरू कराव्यात तसेच तालुक्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पुणे- जम्मूतवी झेलम एक्सप्रेस, महाराष्ट्र एक्सप्रेस, पुणे-अमरावती एक्सप्रेस या गाड्यांना थांबा मिळावा. तसेच नव्याने सुरू करण्यात आलेल्या वंदे भारत पुणे-नागपूर एक्सप्रेस या प्रमुख रेल्वे गाडीला देखील राहुरी रेल्वे स्टेशन येथे थांबा मिळावा याबाबत आपण लवकरच रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करणार असल्याचे राहुरीचे आ. शिवाजीराव कर्डिले यांनी सांगितले आहे.

# कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या उमा कासारे यांच्यावर यशस्वी उपचार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सावेडी उपनगरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सौ. उमा विजय कासारे (३८) यांच्यावर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील हॉस्पिटलमध्ये तातडीने उपचार करण्यात आले. यशस्वी उपचारानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे.



गेल्या आठवड्यात सावेडी परिसरात कुत्र्यांनी अचानक हल्ला केल्याने कासारे यांच्या हात व पायांवर खोल जखमा झाल्या होत्या. त्यावेळी नागरिकांमध्ये भयाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने विखे पाटील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या उपचार प्रक्रियेसाठी मा. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांनी पुढाकार घेऊन सर्व उपचार मोफत करण्याची जबाबदारी स्वीकारली. हॉस्पिटल प्रशासन, वैद्यकीय अधिकारी व परिचारिका वर्गाने तातडीने सेवा पुरवून कासारे यांना नवजीवन मिळवून दिले. या मोहिमेत भाजपा शहर सरचिटणीस निखिल वारे यांनीही विशेष सहकार्य केले. उपचारानंतर कृतज्ञता व्यक्त करताना उमा कासारे म्हणाल्या, डॉ. सुजयदादा यांनी वेळेवर मदत केली नसती, तर माझे प्राण धोक्यात आले असते. हॉस्पिटलमधील सर्व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. स्थानिक नागरिक व सामाजिक संस्थांनी या सेवाभावाचे कौतुक करत, विखे पाटील हॉस्पिटल नागरिकांसाठी खऱ्या अर्थाने जीवनदाता ठरत आहे, अशा प्रतिक्रिया दिल्या.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केला आहे. हा आदेश १० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

या आदेशानुसार, परवानगीशिवाय कोणीही व्यक्ती शस्त्र बाळगू शकणार नाही, तसेच पाचपेक्षा जास्त व्यक्तींच्या जमावावर निर्बंध राहणार आहेत. मात्र, धार्मिक कार्यक्रम, विवाहसोहळे, मिरवणुका अथवा प्रेतयात्रांवरील जमाव यांना सूट देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी, शासकीय सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी तसेच योग्य परवानगी घेऊन सभा अथवा मिरवणुका काढणाऱ्या व्यक्तींनाही या आदेशातून वगळण्यात आले आहे.

सदर आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# पाच गावठी पिस्तूल नऊ जिवंत काडतुसे जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर:** शहरातील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी पोलिसांनी जोरदार कारवाई सुरू केली असून, काल शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाच गावठी पिस्तूल आणि नऊ जीवंत काडतूसासह तीन आरोपींना जेरबंद केले.

याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.शहरातील अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे उपस्थित होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व त्यांच्या पथकाने सदरची कारवाई पार पाडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक किरणकुमार कबाडी यांना श्रीरामपूरमध्ये गावठी पिस्टल विक्रीसाठी तीन जण हे हरेगाव फाट्यामार्गे येणार असल्याची गुप्त माहीती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी हरेगाव फाटा येथे जाऊन सापळा लावला. काही वेळाने एका पल्सर मोटरसायकल (क्र. एमएच १७ डीजी ५७६७) हिच्यावर आलेल्या तीन जणांना पथकाने थांबविले. त्यांची झडती घेतली असता पाच गावठी पिस्टल, नऊ जीवंत काडूतसे त्यांच्याकडे मिळून आली. पोलिसांनी त्यांच्याकडून वरील मुद्देमालासह एक पल्सर मोटरसायकल असा सुमारे ४ लाख ९ हजार रुपये किमतीच्या मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच अक्षय उर्फ भावड्या संजय माळी (वय २३, रा- फत्तेपुर, ता- नेवासा), अजय शिवाजी मगर (वय २५, नांदूर शिखरी, ता- नेवासा), योगेश मच्छिंद्र निकम (वय ३५, रा- वडगाव गुप्ता, ता- अ. नगर) या तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस हेड कॉन्स्टेबल पंकज व्यवहारे, अतुल लोटके, उमेश खेडकर, दिगंबर कारखेले, मल्लिकार्जून बनकर, दिपक घाटकर, फुरकान शेख, प्रशांत राठोड, विशाल तनपुरे, उमाकांत गावडे आदींच्या पथकाने पार पाडली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, शहरात पिस्तूल घेऊन पाठलाग करण्याचा जो प्रकार झाला, तो प्रकार पुन्हा होऊ नये, त्यादिशेने प्रयत्न सुरु आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हद्दपार इसमांवर कोतवाली पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गणेशोत्सव सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कोतवाली पोलिसांनी दोन हद्दपार इसमांवर कारवाई करत त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

मा. उपविभागीय दंडाधिकारी, नगर भाग यांच्या आदेशान्वये विजय गजानन भनगाडे (वय ३२, रा. भवरी चाळ, संभाजी कॉलनी, रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) याला १८ मार्च २०२४ रोजीच्या आदेशानुसार दोन वर्षांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. मात्र, दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२ वाजता तो आपल्या राहत्या घरी सापडला. पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने त्याला ताब्यात घेतले असता त्याने परवानगी न घेता आदेशाचा भंग केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी पो. कॉ. सचिन लोळगे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७८०/२०२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा नोंदवून पुढील तपास पो.हे.कॉ. व्ही.एम. वाघमारे करीत आहेत. सदर इसम यास दौंड पोलीस स्टेशन (पुणे ग्रामीण) येथे सोडण्यात आले आहे.

याचप्रमाणे, ऋषभ उर्फ सनी प्रकाश क्षेत्रे (वय २३, रा. जहांगीर चाळ, माणिकनगर, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) याला २१ सप्टेंबर २०२३ रोजीच्या आदेशानुसार दोन वर्षांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. मात्र, दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजता तोही आपल्या राहत्या घरी आढळून आला. त्याला गुन्हे शोध पथकाने ताब्यात घेतले असून, पो. कॉ. सचिन लोळगे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७८५/२०२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पुढील तपास पो.हे.कॉ. विशाल दळवी करीत असून, सदर इसम यास शिरुर पोलीस स्टेशन (पुणे ग्रामीण) येथे सोडण्यात आले आहे.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर विभाग) शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या नेतृत्वाखाली पोसई गणेश देशमुख व त्यांच्या पथकाने केली.

# जिल्ह्यात ४ सप्टेंबर पर्यंत यलो अलर्ट

### प्रशासनाचे दक्षतेचे आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यासाठी २ ते ४ सप्टेंबर या कालावधीत वीजांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा तसेच तुरळक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्याचा अंदाज वर्तविला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात यलो अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.



पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांत पावसाचा जोर वाढल्यास भिमा, प्रवरा, गोदावरी, घोड, सीना आणि मुळा नदी परिसरातील पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे. सध्या कोतूळ येथून मुळा धरणाचा विसर्ग सुरू असून नदीकाठावरील नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मेघगर्जना, वीज किंवा वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली किंवा त्याजवळ थांबू नये, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.वादळादरम्यान विद्युत उपकरणांचा वापर टाळावा, वीजवाहक भागांपासून दूर राहावे. मोकळ्या मैदानात, टॉवरजवळ, विद्युत खांबाजवळ किंवा लटकणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. जाहिरात फलकांच्या आसपास थांबू नये. मोकळ्या जागी असल्यास गुडघ्यावर बसून डोके व कान झाकावे. धरण व नदी परिसरात पर्यटन किंवा पाण्यात उतरणे टाळावे; धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. पाणीपातळी वाढल्यास नदी, ओढा, नालेकाठावरील नागरिकांनी त्वरित सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे.पाण्यावरून वाहणारे पूल ओलांडू नयेत. मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये थांबू नये. डोंगरपायथ्याशी राहणाऱ्यांनी अतिवृष्टीच्या स्थितीत वेळीच स्थलांतर करावे, घाटरस्त्याने प्रवास टाळावा. शेतीमाल व जनावरांचे संरक्षण करण्यासाठी योग्य नियोजन करावे.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाणे किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. जिल्हा नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांक - १०७७ (टोल फ्री), ०२४१-२३२३८४४, २३५६९४० उपलब्ध आहेत.

